साप्ताहिक
# माणूस
शनिवार । २९ जून १९७४ । एक रुपया

**गुजराथच्या विद्यार्थ्यांनी भ्रष्टाचार, महागाईविरुद्ध पाऊल उचलले; ते भक्कम रोवून ठेवले. त्यामुळे जनतेचा त्यांना भरपूर पाठिंबा मिळत राहिला. राजकीय पक्ष त्या आंदोलनात उतरले खरे, पण आंदोलनाची दिशा केव्हाच त्यांना ठरवता आली नाही. युवाशक्ती वळवील तिकडेच आंदोलनाचा रोख वळत राहिला. मराठवाड्यात मात्र याच्या नेमके उलट घडले.**





**आंदोलनातील काही बोलकी दृश्ये** : परीक्षांवर बहिष्कार टाकून विद्यार्थी बाहेर आले. बंद मोर्चे, सत्याग्रह यांना उधाण आलं. जनता हळूहळू आंदोलनात उतरली. प्राध्यापकांनीही उत्स्फूर्त साथ दिली. काही ठिकाणी प्राध्यापकांनी नेतृत्वही केलं. □

रेल्वे रोको, स्टेशन बंद–या आंदोलनांना जोर चढला. पोलिसांनी दडपशाही सुरू केली. रेल्वे स्थानकापासून एक एक मैल अंतरावर धरणे धरूनही रेल्वे उलथापालथी, घातपाताचे आरोप लावले गेले.

आंदोलनाचा जोर वाढला तशी पोलिसी दडपशाही वाढली. छडीमार, लाठीमार इ. मोठ्या प्रमाणात सुरू झाले. ट्रक्स भरभरून सत्याग्रही कोंबले गेले.

...आणि नंतर मुंबईच्या वाटाघाटी आणि आंदोलन मागे घेण्याच्या घोषणा झाल्या. वाटलं, सर्व मिटलं. पण विद्यार्थ्यांना हे पटलं नाही. आपले नेते फिरले अशी त्यांची भावना झाली. सर्वांना नाईकांचे 'चमचे' ठरवण्यात आलं. ठिकठिकाणी मग 'चमचा मोर्चे' निघाले.






जी. एं. ना पाच हजाराची माया मिळाली....
....तिला काजळ लागायला नको होते!
६९,७०,७१,७२,७३ का ७४ ?
काजळमाया


आता माल केव्हा येईल ?
माल नाही!


कम्म्माल आहे ना इंग्लंडची ? ६२१ धावा !
कम्माल कसली ? नंबर एकचे पळपुटे आहेत !
इंग्लंडच्या धावा: ६२१


मंत्री-मंडळात तूर्त वाढ नाही !
श्याम जोशी

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २९ जून | अंक : पाचवा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


# पहिले पर्व संपले....

॥ मराठवाडा वार्तापत्र ॥ सु. ल. सोमण ॥

मी औरंगाबाहेत पोचलो, तेव्हा मराठवाडा आदोलनातले एक पर्व सपत आलेले होते. सपलेले नव्हते. काही धागे अद्यापही उलगडले जात होते. ह्या आंदोलन पर्वात भ्रष्टाचार, बेकारी, लाचलुचपत, महागाई, विकास आदी अनेक गोष्टीवर नारे लगावले गेले. काही भ्रष्टाचार प्रकरणे, संबधित हितसबधियाना सुरक्षित अतरावर राखून उघडकीसही आणली गेली. महागाई विरूद्धही आदोलनाचा रोख होता असे आदोलनाचे पुढारी म्हणतात. पण ज्या पद्धतीने ते छेडले गेले, त्यावरून महागाई विरोधाचा सूर फारसा कुठे ऐकू आला नाही असे मला वाटते. ह्या आंदोलन पर्वाचा फार मोठा भाग विकास-लढयाने व्यापला आहे. त्यामुळे विकासाच्या मागण्याही पुढे आल्या. त्या मागण्या बहुताशी मान्य झाल्या असे विद्यार्थ्यांचे पुढारी आणि मराठवाडा जनता विकास परिषदेचे (आणि जनता कृति समितीचेही ! कारण दोन्ही एकच आहेत !!) नेते म्हणतात. नादेड-बीड-उस्मानाबाद जिल्ह्यातल्या मंडळींना मात्र मराठवाड्याच्या सतुलित विकासाच्या दृष्टीने काहीही मागण्या मान्य झाल्या नाहीत असेच वाटत आहे. आदोलन असे विविध प्रश्नांवर लढले गेल्याचे म्हटले जात असले, आणि काही मडळी म्हणतात त्याप्रमाणे 'फार मोठा व्यापक पाया', 'मुलभूत विचारसरणी' वगैरे घेऊन उभे राहूले असे क्षणभर मान्य केले तरी, एक दोन निश्चित गोष्टींनीच ह्या आदोलनाला मर्यादले आहे. निदान माझा तरी, मराठवाडाभर हिंडल्यावर तसा ग्रह झाला आहे.

हे आदोलन प्रायः विद्यार्थ्यांचेच फक्त होते. त्यानीच ते सुरू केले. मराठवाडाभर पसरवले. आणि, शेवटी काहीनी मागे घेतले. काहीचा आंदोलनाचा अट्टाहास आजही सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या ह्या आदोलनात जनतेने अधूनमधून प्रामाणिक साथ केली. राजकारण्यानीही केली. पण सोयीनुसार. व्यवस्थित गणिती आडाखे बाधून. जविप (जनता विकास परिषद) रिंगणात उतरली आपल्या मागण्याच घोडे पुढे दामटायच्या हेतूने. जनसघी मंडळी उतरली कुठे मराठवाड्याचा गुजराथ करता येतो का ते चाचपण्यासाठी. कॉंग्रेसवाले सर्वात हिशोबी. भ्रष्टाचार विरोधाचा जो थोडा रोख आदोलनाला मध्यतरी येऊ पाहत होता, त्याला ह्या लोकांनी झक्क कलाटणी दिली. विकासाचे नाणे त्यानी पुढे केले. पण त्याचेही त्यांना सोयरसुतक नव्हते. ज्या क्षणी त्याना पटल की यशवतराव चव्हाणसाहेबाना मराठवाड्यातल्या कॉंग्रेस जनाची रुखरुख समजली आहे; मराठवाडा आदोलनाच्या सदर्भात वसतरावावर साहेब नाराज आहेत, त्यावेळी, विकासाच्या मागण्यानाही मुरड घालून मडळी एकदम गप्प झाली. एकूण आंदोलन निमित्ताने स्वत.ची इमेज प्रोजेक्ट झाल्याचे समाधानही होतेच. कॉंग्रेसातर्गत स्वत.चे राजकारण इतपत यशस्वी झाल्यावर ह्या मडळीनी आदोलनाला असलेला पाठिंबा काढून घेतला. ही मडळी गेल्यावर जविप कपनीचाही नाईलाजच होता. शे. का. पक्ष इथला जरा मातबर पक्ष. त्याचे अण्णासाहेब गव्हाणे व त्याचे चिरजीव विद्यार्थी नेते विजय गव्हाणे दोघापुढेही फारसा दुसरा पर्याय नव्हता. कारण हे दोघे व इतर काही प्रमुख शेकाप पुढारी सोडल्यास, बहुसख्य शेकाप मडळी आदोलनाच्या कडेला तरी होती किंवा बाहेर तरी ! त्यांची सत्ता परभणी जिल्हा परिषदेवर. तेव्हा आदोलन वाढून, चालू राहून पुन्हा जर रोख भ्रष्टाचाराविरूद्ध वळला, तर ते आदोलन त्यानाही जड जाण्याची शक्यता होती ! इथे श्री विजय गव्हाण्याबाबत थोडा खुलासा आवश्यक आहे. ते युक्रादचे आहेत. मराठवाड्यातले प्रति कुमार असे कुणी त्यांना म्हणते. ते विद्यार्थी कृती समितीचेही प्रमुख आहेत. व सर्वच राजकीय पक्षावर त्याचा राग दिसतो. सध्या ते अर्थातच शेकापमध्ये नाहीत. पण परभणीत मजपाशी असे अनेकजण बोलले की, 'विजयच्या हालचालीकडे शेकाप तरी निदान, अण्णासाहेबांची शेकाप आमदारकी पुढे चालवायला पोरगा चागला तयार होतो आहे ह्याच दृष्टीने पाहतात.' पण त्याची सभा जी मी पाहिली, सभाविषयी जे ऐकले त्यावरून तरी श्री. विजय गव्हाणे, बहुसख्य पुढारी मंडळीच्या लाईनीतच तयार होताना दिसत आहेत. असो.

विद्यार्थ्यांनी, सुरू केलेल्या, वाढवलेल्या ह्या आदोलनाचा विविध राजकीय गटानी आपापल्या परीने उपयोग करून घेतला. प्रत्येकाने आपल्या दिशेने हे आदोलन खेचायचा प्रयत्न केला. त्यात सर्वाधिक यश आले ते कॉंग्रेसवाल्यांना. आपल्या मर्जीप्रमाणे ते आदोलनात उतरले. त्यानी आंदोलनाचा रोख बदलला. स्वत.च्या मर्जीप्रमाणे,

स्वत.ची प्रतिमा कॉंग्रेस हायकमांडसमोर (इथे कमांड म्हणजे साहेबच फक्त !) उजळून घेतल्यावर त्यानी आदोलन मागे घेतले. स्वतः तर घेतलेच, पण स्वत.बरोबर इतरानाही त्यानी मागे खेचले. त्याचे हे मोठेच यश मानावे लागेल. सामर्थ्य प्रदर्शन, विद्यार्थ्यांची एकी ह्या दृष्टीने ह्या आदोलनाला प्रचड यश मिळाले हे मान्य केलेच पाहिजे. पण, ह्या आदोलनाने, कॉंग्रेस व अन्य लोकाच्या पक्षीय राजकारणाला वाव मिळू दिला, त्याच्या तालावर आदोलनाचे रगरूप पालटू दिले हे या आदोलनाचे मोठेच अपयश मानावे लागेल. ज्या सहजतेने हे घडून येऊ शकले त्यावरूनच मूळ आदोलन, भक्कम असले तरी किती कच्च्या पायावर उभे होते ते लक्षात येऊ शकेल. एकूण समाजव्यवस्था वदलण्यासाठी हे आदोलन उभे राहिले, प्रस्थापिताविरुद्ध दीर्घकाळ लढा हे ह्या आदोलनाचे स्वरूप होते वगैरे वगैरे, जो भलामोठा प्रचार ह्या आदोलनाबाबत केला जातो तो फार फसवा आहे

हे आदोलन वस्तुतः उभे राहिले ते एका तात्कालिक, क्षणैक चिडीतून. परीक्षेच्या बहिष्काराचे त्याला स्वरूप दिले गेले. ही चीड, हा बहिष्कार हाही सुरुवातीला मर्यादीतच होता. वसमत, परभणी, आबेजोगाई व नतर नादेड. मराठवाडाभर तो उत्स्फूर्त देखील नव्हता. वसमतच्या गोळीबारात २७ मार्चला दोन विद्यार्थी मारले गेले. त्यानतर २ एप्रीलपर्यंत, म्हणजे तब्बल ६ दिवस, वसमत–परभणी परिसर वगळता इतरत्र फारशी चीड कुठे नव्हती. २ एप्रीलला परीक्षेवर बहिष्कार घातले गेले ते ह्याच परिसरात. आबे-जोगाई-नादेडला लोण लगेचच पोचले. पण औरगाबादेतला 'उत्स्फूर्त-पणा' परभणीच्या विद्यार्थ्यांनी तिथे येऊन केद्रे बद पाडेपर्यंत दिसून आला नव्हता. फार काय, वसमत-परभणी इथे बहिष्कार सुरू असताना औरगाबादेत खुद्द श्री. विजय गव्हाणे पेपर्स लिहीत होते असे अनेकानी सागितले. बीडमध्ये वहिष्कार चौथ्या पाचव्या दिवशी पोचला; तर उस्मानाबाद जिल्ह्यात परीक्षा बद पडल्या त्या बहिष्कारामुळे नव्हेत, तर विद्यापीठानीच परीक्षा बेमुदत पुढे ढकलल्याचा निर्णय घेतला म्हणून ! 'वसमतचा गोळीबार बेकारावर झाला. शिक्षणाच्या कारखान्यामधून बेकार तयार होतात. आज आपण परीक्षा दिल्या तर आपणही असेच बेकार होऊन कुठेतरी गोळ्या झेलायला जाऊ.' असल्या विचारसरणीतून बेकारी विरुद्ध बेकारीला जबाबदार असणारी परिस्थिती—समाजरचना बदलून घेण्या-साठी हे आदोलन उभे राहिले असे मराठवाड्याबाहेर अनेकजण म्हणतात. विशेषतः युक्रादच्या वरिष्ठ नेतृत्त्वाचा तसा दावा आहे. तसे असते, तर मुळात हे आदोलन उभे राह्यला वसमत गोळीबारा-नंतर पाच-सहा दिवस जावे लागले नसते. खुद्द औरंगाबाद, की जिथेच प्रामुख्याने 'युक्राद'चा विशेष जोर आहे, त्या ठिकाणी ह्या आंदोलनाची ठिणगी पाडायला परभणीच्या विद्यार्थ्यांना जावे लागले नसते ! ह्या उलट, मला तर असे वाटते की, क्षणैक उद्रेकाच्या स्वरुपातच केवळ हे आदोलन प्रथम उभे राहिले. परभणीला ते प्रथम उभे राहिले कारण वसमत हे गाव त्याच जिल्ह्यातले ! जवळ असलेले. शिवाय दोनच वर्षापूर्वी परभणीकरानी कृषीविद्यापीठाचे यशस्वी आदोलन जवळून पाहिलेले.

### अस्वस्थ मराठवाडा

तसा मराठवाड्यातला विद्यार्थी गेल्या सवध वर्षभर अस्वस्थच आहे. प्रथम फी माफी (आणि नाथ हटाव!) आदोलन आणि नतर शिष्यवृत्ती आदोलन ! पण दोन्ही आदोलनाना भरपूर राजकीय आणि जातीय रग. त्यामुळे ह्या आदोलनांची व्याप्ती फारच मर्यादीत राहिली. औरगाबाद हेच प्रामुख्याने आदोलनाचे मुख्य केंद्र राहिले. विद्यार्थ्यात फाटाफुटही मोठ्या प्रमाणात राहिली. पहिले फी माफी आदोलन 'मुसा' ह्या अफलातून सघटनेचे. युक्राद आणि दलित विद्यार्थी त्यापासून अलिप्त राहिले. काही अशी आदोलनाच्या विरोधातच राहिले. कुलगुरू नाथाना घेराव, दलित आणि सवर्ण हिंदू ह्याच्यातल्या मारामाऱ्या ह्यात ते आदोलन सपल. शिष्यवृत्ती आदोलन हे प्रामुख्याने दलित विद्यार्थ्यांचे आदोलन युक्रादने ते उचलून धरले. कुमार सप्तर्षींनी औरगाबादेत तळ ठोकला. घेराव वगैरे झाले. दलित-दलितेतरामध्ये मारामाऱ्या झाल्या. दलित पॅन्थर्सनी, 'फुटक्या कवड्या मिळवणाऱ्या लाचार मागण्या नकोत, लढा पाहिजे तो सर्वकष. दलिताचे सगळे प्रश्न सोडविणारा !' अस म्हणून लढ्याला विरोध केला. पण शेवटी आदोलन सपल ते दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत काही हगामी वाढ घेऊन. 'मुसा'ने ह्या आदोलनाला पाठिंबा दिला, पण लाबून. मुसाचे किंवा इतरही सामान्य दलितेतर विद्यार्थी आणि दलित ह्याच्यात निर्माण झालेली दरी मात्र ह्या युक्रादने उचलून धरलेल्या आंदोलनामुळे कमी झाली नाही.

ह्या आदोलनाच्या मधन मधन काही वर्षापूर्वी स्थापन झालेल्या जनता विकास परिषदेची अधिवेशने मराठवाडाभर सुरू होतीच. ही परिषदही क्वचीत् आदोलनाची भाषा काढीत होतीच. सध्याचे ठरावीक चाकोरीतले शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्याची सख्या मराठ-वाड्यात दरवर्षी हजोरानी वाढत आहे. त्यामुळे मुबई-पुण्यासारखा शहरी विकास हाच इथे आदर्श नोकऱ्या निर्माण करणारे कारखाने म्हणजे विकास असली चमत्कारिक कल्पना मूळ धरलेली. तसे मोठाले कारखाने इथे नाहीत, त्यामुळे इतर यत्रणा नाहीत. म्हणून

---

**भकास मराठवाडा : १**

३१ मार्च १९६९ रोजी महाराष्ट्रात १२ केंद्रीय सार्वजनिक उद्योग अस्तित्वात होते. त्यातून ५२१·३६ कोटी रुपयाची गुतवणूक झालेली होती. यापैकी एकही उद्योग मराठवाड्यात वसलेला नाही.

याहूनही अधिक म्हणजे महाराष्ट्र सरकारने १४ नवीन केंद्रीय उद्योग महाराष्ट्रात वसविण्याची शिफारस केली. यातही एकही उद्योग मराठवाड्यात वसविण्याची शिफारस केलेली नाही. ◘

दुष्काळाच्या काळात ग्रामीण विद्युतीकरणाच्या खास योजनेनुसार एकट्या यवतमाळ जिल्ह्यास ३१ लक्ष रुपये मजूर करण्यात आले तर मराठवाड्याच्या ५ जिल्ह्यास केवळ २९ लक्ष रुपयेच मजूर केले.

पाचव्या योजनेत सोलापूर मेडिकल कॉलेज सरकारच्या हाती घेण्यासाठी १·८० कोटी रकमेची तरतूद करण्यात आली. तर कित्येक दिवसापासून आश्वासन दिलेल्या अबेजोगाई मेडिकल कॉलेजसाठी एक छदामही नाही. ◘

---

## रणांगणावरच्या युद्धाचा केंद्रबिंदू परभणी-नांदेड-आंबेजोगाई या परिसरात होता. पण....

बेकारी. विकासाच्या मागण्या इथे चटकन मूळ धरतात त्या ह्या कारणानी. विकास नाही म्हणून मराठवाड्यातल्या तरुणापुढे अनेक प्रश्न उभे राहातात ह्या भावनेतून. त्यामुळे असलेल्या चिडीतून. अनेक प्रकारची आकडेवारी वेळोवेळी प्रसिद्ध करून जनता विकास परिषदेने ही चीड जोपासलेली आहे मराठवाड्यातल्या कुठल्याही आदोलनात, ह्यामुळेच, ह्या चिडीमुळेच मराठवाड्याच्या लोकाच्या दैन्यावस्थेचे व त्या अनुषगाने मराठवाड्याच्या विकासाचे प्रश्न आपोआपच डोकावतात.

ताज्या आदोलनातही नेमके तेच झाले. २ एप्रिलला परभणीच्या परिसरात आदोलन उभे राहिले ते वसमत गोळीबाराचा आधार घेऊन. मुबईत श्री. शरद पवारानी घोषीत केले की, ' विद्यार्थ्यांनी पोलिसाजवळून बदुका हिसकून घ्यायचा प्रयत्न केला. त्या गडबडीत बदुक उडाली व त्यात दोन तरूण ठार झाले.' वसमतमध्ये त्या दिवशी हजर असणाऱ्या अनेकाना वस्तुस्थिती भिन्न असल्याचे माहित होते त्यामुळे ही चीड वाढली. परभणी परिसरात आदोलनाची ठिणगी पडली. हे आदोलन सघटीत करण्यात, असतोषाला—चिडीला आंदोलनात्मक तोड फोडण्यात महत्त्वाचा वाटा उचलला तो तामसकर ह्या चळवळ्या, धडपड्या परतु नि पक्ष विद्यार्थी नेत्याने. एकूण आदोलनाला काहीशी व्यापक भूमिका देण्याचाही त्याने प्रयत्न केला. पण तो फारसा यशस्वी झाला नाही आणि आदोलन उभे राहिले ते गोळी-वाराच्या चौकशीची मागणी घेऊन. तीन-चार तारखेच्या सुमारास औरगाबादची परीक्षा केंद्र बद पडू लागल्यावर, युक्राद आदोलनात सहभागी झाल. चार तारखेला आदोलन पसरू लागले आणि त्याच दिवशी संध्याकाळी वसतराव नाईकानी मुबईत घोषणा केली—वसमत गोळीबाराच्या न्यायालयीन चौकशीची ! दोन तारखेपासूनच्या आदोलनात हीच प्रमुख मागणी होती ती मान्य झाली नेमक्या अशावेळी की जेव्हा विद्यार्थ्यांच्या परीक्षा-बहिष्काराला जोर चढला होता. युक्राद वगैरे घटक नुकते आदोलनात उतरू पाहात होते. तेव्हा त्यावेळी, तात्कालीक स्वरूप प्राप्त झालेले हे आदोलन मागे घेणे कुणालाच परवडणारे नव्हते. परीक्षेच्या मडपातून चिडून बाहेर पडलेला जमाव. त्याला थड करून परीक्षेला बैस सागणे कुणालाच शक्य नव्हते. तेव्हा तापत्या तव्याचा उपयोग करून घेऊन, भ्रष्टाचार—बेकारी विरुद्ध आदोलनाचा रोख वळवला गेला. बहिष्कार चालूच राहिला. ' मुसा 'चे राजूरकर आदी नेते ह्याना ह्यावेळी आदोलनाला पाठिंबा देण्यावाचून गत्यंतरच नव्हते !

ह्या ठिकाणी एका गोष्टीचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. परभणी, नादेडच्या विद्यार्थ्यांनी जोर धरून ह्या आदोलनाला पुढे रेटल आणि न्यायालयीन चौकशीची मागणी मान्य होताच भ्रष्टाचार, बेकारी विरुद्धचा लढा असे व्यापक स्वरूपही त्यांनीच दिले. ह्या दृष्टीने, लढ्याच्या त्या छोट्याशा काळात, परभणी—नादेडचे लढ्याला मिळालेले नेतृत्व वेगळे दिसले. निदान ह्या आधीच्या दोन आदोलनाच्या सदर्भात तरी ! त्यातही विशेष म्हणजे हे नेतृत्व युक्रादचे नव्हते; मुसाचे नव्हते, अभाविपचे नव्हते, दलित पॅन्थरचे नव्हते किवा युवक कॉंग्रेसचेही नव्हते. ते नि.सशय तळमळीने धडपडणाऱ्या विद्यार्थी नेत्याचे होते. बेकारीच्या प्रश्नावर मनापासून विचार करणाऱ्या नेत्याचे होते पण दुर्दैवाने हे नेतृत्व नतर मागे पडले. रणागणावरच्या युद्धाचा केंद्रबिदू परभणी—नादेड—आंबेजोगाई ह्या परिसरात होता. पण कागदावरचे घोडे नाचवायचे युद्ध सुरू झाले तेव्हा केंद्रबिदू औरगाबादकडे सरकला आणि तिथेच आदोलनाला मिळू पाहात असलेले व्यापक स्वरूप लयाला जाऊन आदोलन निव्वळ परीक्षेभोवती घोटाळत राहाणार हे दिसून येऊ लागले.

मुळातले नेतृत्व बाजूला ठेवले जाऊन विद्यार्थी समन्वय समिती जन्माला घातली गेली. युक्राद आणि मुसा ह्या एरवी विळ्या भोपळ्याचे नाते सागणाऱ्या सघटना, पण समन्वय समितीचे नेतृत्व ह्याच दोघानी आपसात वाटून घेतले. मुसाला मताधिक्य देऊन. हा सर्व प्रकार विजय गव्हाणे ह्याच्या पुढाकाराने झाला हे आणखी विशेष. मराठवाडाभर कित्येक ' युक्राद ' तरुणाशी बोलण्याची सधी मला मिळाली. त्याना श्री. विजय गव्हाण्याच्या ह्या गौड बगालाची अद्यापही सुसगती लागलेली नाही. तेव्हा इतर तरुणाना ती लागत नाही ह्यात, तेव्हा काहीच नवल नाही. पूर्वी ' युक्राद ' मध्ये असलेल्या पण आता समाजवादी युवजन आघाडीत पुन्हा परतलेल्या एका तरुणाने सागितले— " शेवटी विजय गव्हाणेचे पवित्रे बघितले पाहिजेत ते शेका पक्षाच्या झरोक्यातूनच. भ्रष्टाचार विरोधी आदोलन जे स्वरूप घेऊ पहात होते ते शेकापच्याही मूळावर यायची शक्यता होती जिल्हा परिषदेचे त्याचे पदाधिकारी किवा त्याचे आमदार हे तरी कुठे शुचिर्भूत आहेत बहुतेकाचे हात बरबटलेले आहे. मानवत खटल्यातल्या प्रमुख आरोपीचे वकील पत्र शेकापचे अण्णासाहेब गव्हाणे घेतात, ह्यात काय ते तुम्ही समजून घ्या ! विजय गव्हाणेनी शेखर रजूरकरशी गुफ्तगू करून, कुणाला विश्वासात न घेता, ११ जणाची समन्वय समिती घोषित केली त्याचे मागचे राजकारण हे असे आहे. तसे तो न करता, तर विकासाच्या मागण्यावर हे आंदोलन ढकलणे त्याला जमलेच नसते. आणि भ्रष्टाचार विरोधाची धारही कमी झाली नसती. पण ठिकठिकाणच्या विद्यार्थी नेत्याना कृती समितीच्या सदस्यांना विश्वासात न घेता हे धोरण जाहीर करून

### भकास मराठवाडा : २

**दरडोई उत्पन्न**

| | १९५५–५६ | १९६८–६९ | वाढ |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | रु. २९२।– | रु. ६९२।– | रु. ४००।– |
| मराठवाडा | ,, १७४।– | ,, ४२५।– | ,, २५१।– |

**दरडोई वीज वापर (कि. वॅ.) १९७०–७१**

| | |
|---|---|
| बृहन्मुबई | ६८४.४ |
| मुबई विभाग | १०२.२ |
| पुणे विभाग | ९५.८ |
| विदर्भ | ८२.३ |
| मराठवाडा | १९.२६ |

## वसमत गोळीबारातले दोन बळी

या गोळीबारासंबंधी अनेक हकिगती ऐकू येतात. त्यातली एक अशी :

...माने आणि बेग हे दोन हवालदार रस्त्यातून चालले होते. माने आर्म्ड फोर्सेसचा. बेग साधा. माने आजारी होता म्हणून त्याची रायफल बेगजवळ होती. तो भडक डोक्याचा. एका हॉटेलाजवळ मुलाखतीसाठी आलेल्या काहींचा घोळका. कुणी काही कॉमेंटस केल्या. कॉलेज विद्यार्थी करतात तशा. बेग भडकला. हातातली रायफल सरळ झाडली. पुन्हा थोडया वेळाने आणखी एक. ऑर्डर वगैरे काही नाही...रायफल बेगकडे कशी, हा चौकशीचा प्रपंच नको म्हणून मानेने गोळ्या झाडल्याचे कबूल केले... पुढील चौकशी टळावी म्हणून फायरींग योग्य वातावरण असल्याची, फायरींगची ऑर्डर असल्याची 'ॲलिबी' तयार करण्यात आली..."

खरं खोटं देव जाणे. पण देविदास राठोड आणि रामा शिसोदे ह्यांचे प्राण त्या गोळ्यांनी घेतले आणि आंदोलन उभं राहिलं...

---

विजय गव्हाणेनी विद्यार्थ्यांची पंचाईत केली."

मी नांदेडला असताना, विद्यार्थी कृती समितीची बैठक होती. तिथेही अनेक विद्यार्थी प्रतिनिधींनी विजय गव्हाणे आदींच्या नेतृत्वावर हल्ले चढवले. पण दुर्दैवाने, "... असे जुने विषय काढून भांडणे चालू ठेवायची असतील, तर मलाही बरेच कडक बोलावे लागेल. मग ते तुम्हाला फार जड जाईल..." असे बोलूनही श्री. विजय गव्हाणे ह्यांनी आपली बाजू मांडली नाही. 'मुसा'चे नेते ह्या कृती समितीत नाहीतच. त्यामुळे त्यांच्यावर आरोप असूनही अशा बैठकीत त्यांचा खुलासा मिळणे शक्यच नव्हते.

काही का असेना; पण मुसा-युक्रांद ह्या आंदोलनात एकत्र आले, नव्हे नेतृत्वही त्यांनी वाटून घेतले. आणि ह्याच घटकेला मराठवाडा विकासाच्या मागण्या ह्या आंदोलनाने उचलून धरल्या. त्यामुळे मराठवाडयाच्या मर्यादा आपोआपच आंदोलनाला आल्या. जनतेचा आंदोलनातला सहभागही वाढला. साहजिकच आंदोलनाला वेगळे स्वरूप आले. परभणी नांदेड परिसरात भ्रष्टाचार विरोधी काही प्रकार घडत होते. पण हळूहळू तीही मंडळी ह्या विकासाच्या मागण्यांच्या गाडयाला जोडली गेली. ह्या आधी सांगितल्या प्रमाणे कांग्रेसची मंडळी आडरस्त्यानी आत शिरताच, भ्रष्टाचार-विरोधाचा आणि आंदोलनाचा उरला सुरला संबंध संपला. जविपच्याच मागण्या विद्यार्थ्यांनी उचलून धरल्यामुळे परिषदेला रिंगणात उतरणे भागच पडले. जनता विकास परिषदेबरोबर (जविप) इतर मंडळीही आली. आणि भ्रष्टाचार–महागाई–बेकारी विरुद्ध जे सर्वव्यापी जनआंदोलन उभे राहील असे वाटत होते, ते मराठवाडाव्यापी जनआंदोलन मराठवाडयाच्या विकासाच्या ओबडधोबड मागण्या घेऊन उभे राहिले.

## फिरून फिरून आंदोलन परीक्षेभोवतीच घोटाळत राहिले आणि परीक्षेच्या प्रश्नावरतीच संपले

साहाजिकच अशा आदोलनात विद्यार्थ्यांचा मूळ उत्साह कमी झाला. औरंगाबादच्या गोळीबारात आणखी चार ' हुतात्मे ' बनल्यावर तर ह्या उत्साह आणखीनच ओसरला. सत्याग्रह, तुरूग भरणे वगैरे कार्यक्रमाना पुरेसे विद्यार्थीही मिळेनासे झाले. ओघानेच एकूणच आदोलनाचे नेतृत्त्व विद्यार्थ्यांच्या हातून निसटले. (अनेक विद्यार्थ्यांना हे प्रतिपादन मान्य होणार नाही. पण ती वस्तुस्थिती आहे !) आणि कॉंग्रेसने मुबईला जाऊन जे अफलातून राजकारण केले, त्यामुळे जविपच्या श्रॉफ-भालेराव आदी मडळीकडचे दिखाऊ नेतृत्त्वही साफ कोलमडून पडले. प्राप्त परिस्थितीत, काही जुजबी आश्वासने आणि विकास विषयक वाटचालीच्या तत्त्वाना व काही प्रत्यक्ष प्रकल्पाना मान्यता मिळवून घेऊन आदोलन मागे घेणे हाच एकमेव मार्ग होता. जनता विकास परिषदेने तोच पत्करला. विद्यार्थी नेत्यामध्ये जाणून बुजूनच ' मुसा 'ला प्राधान्य दिले गेलेले. मुसा ही कॉंग्रेसचा पगडा असलेली सघटना. साहाजिकच मुसानेही एकूण समेटाला मान्यता दिली असे म्हणतात. स्थानिक युक्रादची देखील प्रथम भूमिका परीक्षेवरील बहिष्कार मागे घेण्याची होती. आणि वर उल्लेखिलेला तपशील लक्षात घेता, ही भूमिकाही उमजू शकते.

युक्रादच्या समेटाच्या पावलाबाबत, वरून (युक्रादच्या मध्यवर्ती शाखेकडून) आलेला एक आदेशही इथे महत्त्वाचा ठरतो. विद्यार्थ्यांच्या ह्या मोठ्या आदोलनात एक फार मोठा गट सहभागी झाला नव्हता. दलित विद्यार्थ्यांचा हा गट. ह्याच गटाला बरोबर घेऊन युक्रादने त्यांच्या शिष्यवृत्त्याचा लढा लढवला होता. हा गट ह्यावेळी अलिप्तच नव्हे तर काहीसा विरोधात होता. त्यांच्या दृष्टीने ते काहीसे समर्थनीयही होते. प्रथमच शिक्षणाची सधी मिळालेल्या ह्या गटातल्या बहुसख्य विद्यार्थ्यांचे दैनंदिन जीवनच, मिळणाऱ्या शिष्यवृत्त्यावर अवलबून असते. परीक्षा न देणे म्हणजे ह्या शिष्यवृत्त्या गमावणे. दलित विद्यार्थ्यांना ते परवडणारे नव्हते. साहाजिकच बहिष्काराला त्यांचा पाठिंबा नव्हता. दलित विद्यार्थ्यांना त्यांच्या पँथर्सच्या विरोधात जाऊनही, आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी 'युक्राद'ने शिष्यवृत्ती आदोलनात खूपच धडपड केलेली होती. परीक्षेवरचा बहिष्कार दलित विद्यार्थ्यांच्या विरोधात जाऊन राबवणे ह्या धडपडीच्या सदर्भात युक्रादला परवडणारे नव्हते. मुंबई–समझोत्याबद्दल ' मुसा'वर टिकेची राळ उडवत असताना, तिथल्याच समझोत्याचा पदर धरून 'परीक्षेसाठी योग्य वातावरण' तयार करण्याचा गडा बाधून युक्राद नेते मराठवाड्यात परतले.

ह्या ठिकाणी, मूळ बडखोरी करून उठलेला परभणी, नादेड, आंबेजोगाई परिसर, पुन्हा एकदा मुंबई समझोत्यावर चिडून उठला.

**साक्षरता प्रमाण – १९७१**

| | |
|---|---|
| कोकण | ३९% |
| पश्चिम महाराष्ट्र | ३८% |
| विदर्भ | ३७·४% |
| महाराष्ट्र | ३९% |
| मराठवाडा | २६% |

मुबई सभेनतर आबेजोगाईच्या सभेत, त्यानं ' मुसा 'वाल्याना येऊच दिले नाही. विजय गव्हाणे आदीना नरमाईच्या भूमिका सोडायला लावून पुन्हा एकदा आदोलनात खेचले. मुबईला गेलेली समन्वय समिती ह्या युवा शक्तीने भिरकावून दिली. नवीन कृतिसमिती स्थापन केली.

परीक्षेभोवती घोटाळत असणारे आदोलन ह्या ठिकाणी निव्वळ परीक्षेवरच येऊन थडकल. बेकारी, महागाई, भ्रष्टाचार, विकास हे सगळे पख गळून पडले. 'मुसा' अलग पडलीच होती. दलित विद्यार्थी विरोधात होते युक्रादचा उत्साह त्यामुळे कमी झाला होता. इथे पुन्हा एकदा आदोलनाचा केंद्रबिंदू परभणी नादेडकडे सरकण्याची शक्यता निर्माण झाली. परतु ऐनवेळी औरंगाबादचे वयोवृद्ध स्वातंत्र्यसेनानी गोविंदभाई श्रॉफ उपोषणाला बसले–परीक्षा विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार पुढे ढकलली जावी ! विद्यापीठही नमले (सरकारी धाकामुळे !) आणि कृती समितीने आंदोलन मागे घेतले.

इथे हे पर्व सपले. आदोलन म्हणत नाही; कारण हे आदोलन अजूनही पुढे चालूच राहील अशी शक्यता आहे. नव्हे मला तशी खात्री आहे. स्वरूप कदाचित बदललेले राहील एवढेच ! असे हे सपलेले पर्व परीक्षेच्या बहिष्कारात सुरू झाले आणि परीक्षेवरच फिरून फिरून स्थिरावत परीक्षेच्या प्रश्नावरच सपले. त्याला मधून भ्रष्टाचार चिकटला, मराठवाड्याचा विकास प्रश्न बिलगला एवढेच. बाकी आदोलनाला फार मोठे व्यापक स्वरूप असे मिळालेच नाही. एक प्रकारच्या गोंधळात हे आदोलन सुरू झाले. दिशाहीन अवस्थेत. सपलेही जवळ जवळ तशाच अवस्थेत. गुजराथेप्रमाणे इथेही वेगवेगळे पक्ष आदोलनात उतरले. काही काळ गुजराथ प्रमाणे मराठवाड्यातही जनआदोलन सुरू होत आहे असे वाटलेही. पण गुजराथच्या व मराठवाड्याच्या आदोलनात एक महत्त्वाचा फरक राहिला. गुजराथच्या युवकाच्या आदोलनाने भ्रष्टाचार, महागाई विरुद्ध पाऊल उचलले; ते भक्कम रोवून ठेवले. त्यामुळे जनतेचा त्यानाच भरपूर पाठिंबा मिळत राहिला. राजकीय पक्ष आदोलनात उतरले खरे; पण आदोलनाची दिशा केव्हाच त्यांना ठरवता आली नाही. युवाशक्ती वळवील तिकडेच आदोलनाचा रोख वळत राहिला. मराठवाड्यात मात्र असे घडले नाही. युवाशक्तीच्या रोपाचा फायदा उठवून राजकीय पक्ष आदोलनाच्या आखाड्यात उतरले. ह्यातल्या ज्या महत्त्वाच्या शक्ती होत्या, त्याना सरकार विरुद्ध लढा काही काळापुरताच राबवायचा होता. सरकार उलथण किंवा काही मूलभूत फेरफार घडवून आणणे हे मुळी त्याचे लक्ष्यच नव्हते. त्यामुळे आदोलनात विद्यार्थ्यांबरोबर (त्यातही विशेषत: परभणी, नादेड, आंबेजोगाई वगैरे ठिकाणच्या !) राजकीय पक्षाची एकवाक्यता होण्याऐवजी अतर्विरोधच जास्त राहिले. आणि युवाशक्ती, मराठवाड्यात कमी पडली म्हणा किंवा त्यांचे काही नेते तेवढे खमके राहिले नाहीत म्हणा, किंवा एकूण परिस्थितीचा तो परिपाक होता म्हणा, पण युवाशक्ती, राजकीय पक्ष ह्याच्यातल्या अतर्विरोधात

पृष्ठ २३ वर

# सोलकढी

## □ चीन हे कोडे आहे

माझ्या लहानपणी चिनी फटाके व कापड-विक्रेते मी पाहिलेले आहेत. ते इतके चमत्कारिक दिसायचे की त्यांच्या बालसुलभ खोड्या काढणे मलासुद्धा सुचले नव्हते. चिनी माणसे उंदीर आणि झुरळे खातात, असे वडीलमंडळींनी आम्हाला गांभीर्याने सांगितले होते. जरा वरच्या वर्गात गेल्यावर चीनच्या प्रचंड भिंतीची माहिती झाली. महाविद्यालयात गेलो आणि चिनी क्रांती आणि तेथली नवी राजवट यांच्याबद्दल ऐकले. तेथे नंदनवनासारखे काहीतरी अवतरले आहे असे कोणीतरी म्हणाले. मी तिकडे फारसे लक्ष दिले नाही. अभ्यास आणि अभ्यासाच्या अवतीभवती ओसंडणारे विविध रंगीत व्यवसाय यांच्यात मी गढून गेलो होतो. मध्ये कधीतरी हिंदी-चिनी भाई-भाई आणि पंचशील यांचा धुंदाऊन घोष केला. १९६२ साली उत्तर सीमेवर युद्ध पेटले आणि चीनचा एक वेगळा चेहरा पाहायला मिळाला. त्याआधीच चिनी खाद्यपदार्थांशी तोंडओळख होऊन कृतार्थ झालो होतो. ज्या हातात बांबूकाड्या शोभाव्या त्या हातांनी बंदुका कोणी कशाला उडवाव्या, हे कोडे मला काही केल्या सुटेना.

चीनबद्दल अशी कोडी सारखीच पडतात. ॲक्युपंक्चर किंवा सूचिकारीचीच गंमत पाहा. सूचिकारी हे असली चिनी प्रकरण आहे. व्याधिग्रस्त रोग्याच्या शरीरात चिनी वैदू पाहता पाहता काही सुया घुसवतो आणि यथाकाल तो रोगी आपला खडखडीत बरा होतो. सूचिकारीने भले भले असाध्य रोगसुद्धा बरे झाले असल्याचे माझ्या ऐकीवात आहे. मुंबई-पुण्याला म्हणे एकदोन सूचिकारांनी दवाखाने खोलले आहेत. त्यांच्याकडे गर्दी बिलकुल नसल्यामुळे आपण उपचारासाठी त्यांच्याकडेच जावे असे माझ्या अनेकदा मनात आले आहे. पण तुम्हाला सांगायला हरकत नाही, तेथे जायला माझी हिंमत होत नाही. अहो एक करता दुसरेच व्हायचे : सुयांना समजा अंगात जागा दिली आणि बाहेर येण्याबाबत त्यांनी असहकार पुकारला तर आम्ही ठोठवायचे कोणाला? त्यापेक्षा चालले आहे ते बरे आहे की; फारसे अंगाशी येत नाही ते.

सूचिकारीबद्दल एक सार्वत्रिक समज असा आहे की तिच्यावर श्रद्धा असलेल्या रोग्याच्या बाबतीतच ती गुणकारी ठरते. म्हणजे काही गुण सूचिकारीचा आणि काही गुण श्रद्धेचा. बाकीच्या बहुतेक प्रगत उपचारतंत्रांमध्ये ही श्रद्धेची भानगड नसते. औषधे आपली अपेक्षित कामगिरी बजावतात. सूचिकारी हे एक प्रकारचे चेटुक आहे असेच कोणालाही वाटायचे; त्यामुळे श्रद्धेशिवाय ते निष्फळ होय, अशी त्याची शिफारस डाव्या हाताने व्हायची.

यापुढे ती त्या हाताने होऊ नये असे लंडनच्या प्राणिसंग्रहालयातल्या एका सुदैवी जिराफाचे प्रामाणिक मत आहे. प्रामाणिक मताबद्दल, विशेषतः ते जर एखाद्या जिराफाचे असेल तर, मला फार आदर वाटतो. या जिराफमामांना जबरदस्त सांधेदुखी जडली. आपला जिराफी डौल आणि उभारी मामांना सांभाळता येईना; ते अगदी टेकीला आले. उपचार तर सारखेच चालले होते. पण दुखणे हटत नव्हते. बाकीची सगळी तंत्रे थकल्यावर सूचिकारीचा विचार पुढे आला. तेथे जिराफाच्या हिंमतीचा काही प्रश्न नव्हता. म्हणजे तशी त्याची अनुमती वगैरे रीतसर घेतलीच असणार. मग ठरल्याप्रमाणे जिराफाच्या खांद्याजवळ दोन लांबलचक सुया खुपसण्यात आल्या. वर पंधरा मिनिटे विजेचा सौम्य झटका देण्यात आला. आणि सांगायची गोष्ट म्हणजे जिराफमामा खडखडीत बरे होत्साते आपले पदलालित्य प्रकट करायला मोकळे झाले. आता या जिराफाची सूचिकारीवर श्रद्धा असली पाहिजे असे लंडनचा जो कोणी पुणेकर होता तो बदलाच. परंतु भाऊ, जिराफांना अशी रजनीशभक्तांसारखी श्रद्धाविद्धा असत नाही, असे लंडनच्या दुसऱ्या एका पुणेकरानेच त्याला ऐकवल्यावर हा पहिला विव्हळत गप्प बसला.

मी जर तो जिराफ असतो तर सूचिकारी हे कसे शास्त्रशुद्ध उपचारतंत्र आहे हे पश्चिमी शास्त्रीपुराणिकांना समजावून सांगितले असते. आता मीच सांगितले असते तर घेतलेही असते समजावून त्यांनी एखाद्या वेळी. एरवी काही काही बाबतीत हे पश्चिमी शास्त्रीपुराणिक महा हेकट असतात. सूचिकारी हे चेटुक आहे असे एकदा त्यांनी पक्के ठरवून टाकल्यामुळे जिज्ञासा टवटवीत ठेऊन त्याचे संशोधन करायला त्यांची तयारी नाही.

त्यांच्या मते;
चिनी सूचिकारी हे चेटुक आहे.

चिनी क्रांती हा चमत्कार आहे.
चीनची भिंत हे आश्चर्य आहे.
चिनी माणूस हे गूढ आहे.
चिनी जेवण हे अद्भुत आहे
चीन हे कोडे आहे!

-अनंतराव



मुक्काम पाचाड

# जिजाबाई पुण्यतिथी : एक सवंग सरकारी समारंभ

भारतकुमार राऊत

एकदरीत आपण उत्सव प्रियच. कुणाही नेत्याची जयती असो नाहीतर पुण्यतिथी. आपण तमाम भारतीय सारख्याच उत्साहान तो उत्सव साजरा करतो. दरवर्षी कसली तरी शताब्दी साजरी करणं हे तर आपण आपल महान कर्तव्ये समजतो. जन्मशताब्दी मिळाली नाही तर मृत्यूशताब्दी तरी आपण शोधून काढतोच. तीही सापडली नाही तर द्विशताब्दी, त्रिशताब्दी वगैरे काहीतरी मिळतेच. पण जन्म, मृत्यू सोडून इतर गोष्टीच्या शताब्दया साजऱ्या करायला आपण मागेपुढ पाहात नाही. याप्रमाणे यदा नुकताच श्रीछत्रपती शिवाजी महाराज राज्यारोहण त्रिशत सावत्सरिक सोहाळा आपल्या नेहमीच्याच उत्साहान साजरा झाला. देशपातळीवर, राज्यपातळीवर, जिल्हापातळीपासून ते थेट गल्ली पातळीपर्यंत जमतील त्या सर्व पातळयावर हा सोहळा साजरा झाला. मत्र्यानी भाषण केली, नाटकवाल्यानी नाटक केली. पोरासोरांनी हिंदी पिक्चर पाहिले. एकूण प्रत्येकान जमेल त्या मार्गांनी हा अभिमानाचा क्षण अनुभवला.

तर या प्रचड उत्सवाची उडालेली धूळ बसते न बसते तोच आणखी एक त्रिशताब्दी आली. राजमाता जिजाबाई याच्या पुण्यतिथीची त्रिशताब्दी. रायगडावर शिवाजी महाराजाचा राज्याभिषेक पार पडल्यानतर अवघ्या दहा दिवसानी रायगडाच्या पायथ्याशी या राजमातेन आपल्या नश्वर देहाचा त्याग केला. या रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या जिजाऊच्या महालाच्याजवळ पाचाड इथ एक समाधी उभारलेली आहे.

तर ही त्रिशताब्दी राज्यपातळीवर साजरी करण्याचा निर्णय आपल्या इतिहासप्रेमी आणि शिवप्रेमी सरकारन घेतला. सरकारन कोणताही निर्णय घेतला की, त्याची अमलबजावणी करण्याकरिता एखादी समिती नेमलीच पाहिजे असा नियम आपल्या घटनेत आहे की काय अशी मला शका वाटते. तर याप्रमाणे एक सोहळा समिती नेमण्यात आली. चार मंत्र्याची आणि चार-दोन बडया लोकाची नाव या समितीच्या यादीत दिसली. सिंदखेडराजा या जिजामातेच्या जन्मगावी आणि पाचाड या मृत्यूगावी सोहळा साजरा करण्याचा निर्णय या समितीन घेतला, त्याप्रमाणे तयारी झाली.

१४ जून. आम्हा वार्ताहराना घेऊन महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धीखात्याची गाडी महाडकडून पाचाडच्या दिशेन वळली. सकाळी दहासाडेदहाची वेळ. पाऊस नुकताच येऊन गेलेला. बोटभर वर आलेली भाताची पिकं जीव धरून होती. सबध वातावरणातच पोपटी जिवतपणा भरलेला. आमची गाडी एका मोठया कमानीतून आत शिरली आणि वेगवेगळया झिंदाबादच्या घोषणा ऐकू आल्या. बाहेर डोकावून पाहिल तर रस्त्याच्या दुतर्फा शाळेतली छोटी छोटी मुल घोषणाफलक घेऊन उभी होती. पुढे जवळ जवळ दर दोन फर्लांगावर अशी शाळेतली मुल घोषणा देताना दिसली. त्याच्या हातातल्या फलकावर शिवाजी महाराज किंवा जिजामातेच्या जय-जयकाराच्या घोषणा असाव्यात अस वाटल होत. पण वेगानं जाणाऱ्या गाडीतून मला त्याच्या फलकावर लिहिलेल दिसल की, 'बॅ. अतुले झिंदाबाद, मोहन धारिया झिंदाबाद, वसतराव नाईक झिंदाबाद.' त्रिशताब्दी कुणाची असा प्रश्न उगीचच माझ्या मनाला शिवून गेला. आपल्या लोकशाहीचा आणि तिच पालन करणाऱ्या आपल्या लोकनियुक्त सरकारचा विजय असो.

अकरा वाजण्याच्या सुमारास आम्ही पाचाड मुक्कामी पोहोचलो. खाशा स्वाऱ्या अद्याप डेरेदाखल व्हायच्या होत्या. पावसाची बारीक भुरभूर चालू झाली होती. आम्ही गाडीतून पायउतार होऊन समाधीच्या दिशेनं चालू लागलो. एका बाजूला अजस्र किल्ले रायगड दिसत होता. रायगडाबद्दल कुठंतरी वर्णन वाचताना शिवाजी महाराजाच या गडाबद्दलच वाक्य वाचल होत की, या अखड पाषाणावर पावसाळयातही रोपटसुद्धा उगवत नाही. खरोखर आजूबाजूचे सर्व डोंगर हिरवेगार झाले असताना आजही रायगडचा काळा पत्थर काळाच दिसत होता. महाराजाच्या कल्पकतेच आणि सावधगिरीच कौतुक वाटल.

आम्ही समाधीजवळ पोहोचलो. तिथं तोरण वगैरे लावण्यात आलेली होती. काही बोर्ड वगैरे होते. पण ते सारेच तकलादू आहेत हे बघताक्षणीच लक्षात येत होते. समाधीची रंगरगोटी केली होती पण तरीही तिचा बकालपणा लपत नव्हता. तब्बल तीनशे वर्षांनी आम्हा इतिहास प्रेमी मडळीना जिजाबाईची आठवण आली होती. हीच जिजाबाई जर दुसऱ्या देशात जन्माला आली असती तर तिच किती कोडकौतुक झाल असत आणि तिच्या समाधीची किती निगा राखली गेली असती याची कल्पनाच केलेली बरी. असो. एकूण आपण भारतीय सर्वच बाबतीत जगावेगळे हेच खरं.

तर आम्ही समाधी पहात असतानाच खाशा स्वाऱ्या तिथं पोहोचल्या. त्यांच्या प्रशस्त मोटारी तिथवर पोहोचाव्या म्हणून रस्ता मोठा करण्यात आला होता. हा रस्ता वाढवणारे कामगार उघडया

पाठीवर उन्ह घेत आपल्या शासनकर्त्यांचं दैवदुर्लभ दर्शन घेण्याकरता रस्त्याच्या कडेला उभे होते. मोटारीचे दरवाजे खटाखट् उघडले. मग नमस्कार, हास्य वगैरे. कॅमेऱ्याचे फ्लॅश उडत होते. आजूबाजूच्या गावातून जमलेल्या बायाबापड्या या डोळे मिचकावणाऱ्या कॅमेऱ्याकडे कौतुकान बघत होत्या मुख्यमंत्र्याची गाडी बघण्यासाठी बाहेर दोन उघडी पोरं गाडीच्या अवतीभवती घुटमळत होती. एका खाकी वेशधाऱ्याच आपली स्वामीनिष्ठा जाणून त्या पोराच्या कुल्यावर चापट्या दिल्या. पोर पळाली. तो शिपाई धन्य झाला. स्वतःशीच हसला. मंत्रीमहाशयानी समाधीचं दर्शन घेतलं. त्यावर फुले वाहिली. नंतर समाधीच्या जवळ अशोकाची रोपटी लावली. गेली अनेक वर्षे या पडक्या समाधीची राखण करणारा, कुलाबा जिल्हा परिषदेचा चाळीस रुपये पगारवाला म्हातारा माळी हा सारा सोहाळा लाबून पहात होता. मंत्र्यानी लावलेल्या अशोकाची राखण करायचं काम आता त्यालाच करायचं होतं.

मंत्री आले तसे, भुर्रकन निघूनही गेले. त्याच्या मागून पुन्हा भराभर गाड्या गेल्या. पाचाड गावात सभेकरता खास हॉल बांधण्यात आला होता. त्यात गाद्यावर लोडाना टेकत मंत्री मंडळी बसली होती. खाली दाटीवाटीन लोक बसले होते. इतक्या गर्दीतही स्वच्छ साड्या नेसलेल्या शहरी गृहिणी आणि मळकट लुगड्यातल्या बायाबापड्या याच्यातली सीमा स्पष्ट दिसत होती. आपल्या राष्ट्रीय ऐक्याचा विजय असो. विषमता नष्ट झालीच पाहिजे पत्रकाराकरता राखून ठेवलेल्या जागेत नेहमीप्रमाणेच इतर मंडळी येऊन खुशाल बसली होती. स्टेजवर मुख्यमंत्री नाईक, गोव्याच्या मुख्यमंत्री शशीकला काकोडकर, बॅ. अन्तुले, सेतु माधवराव पगडी, वत्सलाबाई नाईक, जिल्हापरिषदेचे अध्यक्ष वागारे आदी मंडळी होती. शिवाजी महाराजाचं एक छायाचित्र होतं. पण प्रत्यक्ष जिजाबाईचं छायाचित्र किंवा नामोल्लेखसुद्धा कुठही नव्हता. असो.

सर्व सरकारी कार्यक्रमाप्रमाणेच याही कार्यक्रमाची सुरुवात वसंत देसाईंनी संगीत दिलेल्या गीतान झाली. मग बॅ. अन्तुले बोलायला उठले. कार्यक्रम पत्रिकेवर मोहन धारिया स्वागत करणार, असं म्हटलं होतं. पण ते पुण्यात अडकून पडल्यान हजर राहू शकले नाहीत, असं अन्तुले साहेबांनी सांगितलं. त्यानी सर्वांचं स्वागत केलं. वत्सलाबाई सकट सर्वांना मोठे मोठे पुष्पहार दिले. नंतर सेतु माधवराव पगडी बोलायला उठले. त्यानी या निमित्त काढलेल्या स्मरणिकेचं प्रकाशन झाल्याचं जाहीर केलं. सेतू माधवरावानी जिजाबाईंचा जवळ जवळ सारा इतिहास कथन केला. जिजाबाईची तुलना महाभारतातल्या विदुला किंवा द्रौपदीशीच होऊ शकेल असं ते म्हणाले.

नंतर शशीकलाबाई बोलायला उठल्या. त्या समारंभाच्या प्रमुख पाहुण्या होत्या. सर्व सौभाग्यालंकार ल्यालेल्या शशीकलाबाई राजकारणी दिसण्यापेक्षा अस्सल गृहिणीच दिसत होत्या. त्यांनी आपलं पाच-सहा फुलस्केप कागदावर लिहिलेलं भाषण चक्क वाचून दाखवलं. अशा तऱ्हेन भाषण वाचण्यात रटाळपणा येत असला तरी आपले तमाम मंत्री जसे बहकतात तसं बहकून जायला चान्स नसतो. शशीकलाबाईंचं भाषण छान झालं.

नंतर समारंभाचे अध्यक्ष आणि समारंभ सुरू झाल्यापासून ज्याचा उल्लेख सारखा सारखा 'महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री' अशा शब्दात होत होता, ते वसंतराव नाईक बोलायला उठले. माझ्या माहितीप्रमाणे महाराष्ट्रात दोन असे वक्ते आहेत की, जे अर्थकारणापासून शारीरिक शिक्षणापर्यंतच्या कोणत्याही विषयावर तितक्याच समर्थपणे घोळ घालून बोलू शकतात. त्यापैकी एक म्हणजे अनंत काणेकर आणि दुसरे मुख्यमंत्री नाईक. जिजाबाईबद्दल बोलणं नाईकसाहेबाना फारसं कठीण वाटलं नसावं. ते सराईतपणे बोलले. पब्लिक खूष होईल, असं काहीतरी बोलले. मुलगा आणि आई यानी मिळून इतिहास घडवल्याचं शिवाजी आणि जिजाबाई हे इतिहासातलं एकमेव उदाहरण आहे, असं त्यानी इतिहासकाराच्या आत्मविश्वासान ठणकावून सांगितलं आणि टाळ्या घेतल्या. नंतर आभारप्रदर्शन झालं. पुन्हा नाईकसाहेब माईकपुढे आले आणि त्यानी पाचाडला जिजाबाईचं कायम स्मारक करण्याचा निर्णय शासनानं घेतला असल्याचं जाहीर केलं. आता शासनाचा निर्णय म्हणजे समित्या, उपसमित्या आल्याच. असो.

उकाड्यान हैराण होऊन आम्ही सभास्थानातून बाहेर पडलो. समोर रायगडाकडे पाहिलं तर अनेक तरुण गड चढताना दिसत होते. म्हणजे या तरुण कंपनीला या सभा कार्यक्रमात इंटरेस्ट नव्हताच तर.

मंत्री कंपनी बाहेर आली. पुन्हा हास्य, नमस्कार झडले. धन्यवाद, थँक्यू वगैरे झालं. जिजाबाईची समाधी आता जी काय थोडी फार दिसते आहे, ती बांधण्यासाठी पुढाकार घेऊन निधी जमवणारे वयोवृद्ध दादासाहेब लिमये याची आठवण कुणालाच नाही, असं कुणीतरी बोलताना कानावर पडलं. कोण हे दादासाहेब ? राव–दादाचं राजकारण या राज्यात चालू असताना महाडसारख्या आडगावी रहाणाऱ्या या इतिहासप्रेमाचा गुन्हा करणाऱ्या दादासाहेबाची आठवण कुणाला का म्हणून यावी ? आमची कृतज्ञता धन्य आहे

दुपारचे दोन वाजले होते. मंत्र्याच्या गाड्या एकामागून एक निघाल्या. पावसान बसलेली धूळ उडवत भुर्रकन वेगान निघून गेल्या. रस्ता बांधण्याचं काम करणारे मजूर निथळत्या घामानं दिवसाच्या मजुरीकरता, उपाशी पोटान रांगेत उभे होते, समाजवादी समाजरचनेतल्या मंत्र्याच्या पाठमोऱ्या आकृत्या आणि प्रशस्त मोटारी बघत.

☐ ☐


**मुंबई (भ्रष्टाचार) विश्वविद्यालय**

इमारत प्रकरणींच्या अनेक सुरस आणि चमत्कारिक कथा

माणूस मधून लवकरच एक नवी तोफ

# युगोस्लाव्हिया

## स्वतःच्या मार्गाने समाजवाद

वा. दा. रानडे

युगोस्लाव्हियाच्या कम्युनिस्ट पक्षाची दहावी परिषद नुकतीच झाली आणि पक्षाचे व देशाचे नेते म्हणून टिटो यांची लोकप्रियता आणि प्रभाव थोडाही कमी झालेला नाही हे पुन्हा एकदा दिसून आले. हा ८२ वर्षांचा नेता देशाची सूत्रे समर्थपणे हलवीत आहे. कम्युनिस्ट पक्षाचे ते तहहयात अध्यक्ष आहेत. देशाच्या अध्यक्षपदीही त्यांची बेमुदत निवड झालेली आहे आणि लष्कराचे ते प्रमुख आहेत.

टिटो तीस वर्षांपेक्षा अधिक काळ देशाचे नेतृत्व करीत आहेत. एका व्यक्तीच्या हाती दीर्घकाळ सर्व सत्ता केंद्रीत रहावी का ? हा प्रश्न यातून उपस्थित होतो. व्यक्ती कितीही चागली असली तरी तिने ठराविक मुदतीपेक्षा अधिक काळ सत्तेवर राहू नये. त्यातून अपप्रवृत्ती निर्माण होतात. स्टालिनच्या बाबतीत हा अनुभव आलेलाच आहे. टिटोच्या बाबतीत अशा अपप्रवृत्ती निर्माण झाल्या नाहीत हे खरे पण त्या निर्माण होण्याची वाट कशाला पहावयाची ? दीर्घकाळ नेतृत्व केलेल्याने त्याच्या मार्गदर्शनाची देशाला आवश्यकता असते. अशा नेत्याने मार्गदर्शन जरूर करावे. पण विशिष्ट मुदतीनतर सर्व अधिकार पदावरून कटाक्षाने दूर व्हावे. कम्युनिस्ट चळवळीला नवे वळण देणाऱ्या टिटोनी स्वत. निवृत्त होऊन राजकीय नेतृत्वाबाबत हा पायडा पाडावयास हवा होता.

युगोस्लाव्हिया आपले अलिप्ततेचे धोरण सोडून पुन्हा कम्युनिस्ट गटात जाणार असे अदाज पाश्चात्य निरीक्षक करीत होते पण ते खरे ठरलेले नाहीत. "युगोस्लाव्हिया पुन्हा रशियाच्या वर्चस्व क्षेत्रात जाणार नाही." अशी घोषणा टिटोनी कम्युनिस्ट पक्षाच्या परिषदेत केली तेव्हा सर्व सोळाही प्रतिनिधीनी त्याना टाळयाच्या गजरात साद दिली. टिटो म्हणाले, "आम्ही आमचे धोरण सोडावे किंवा बदलावे म्हणून आमच्यावर अनेकदा दडपण आलेले आहे. पण अशा दडपणापुढे आम्ही कधीच नमलो नाही याचे कारण आमची एकजूट व स्वातंत्र्य टिकविण्याची तयारी. भविष्य काळातही युगोस्लाव्हिया बदलेल अशा खोट्या आशा कोणी बाळगू नयेत स्वतत्र समाजवादी आणि अलिप्त युगोस्लाव्हिया आजच्या प्रमाणेच यापुढेही जागतिक शांतता आणि प्रगतीच्या हितसबधाची जपणूक करीत राहील."

स्टालिनच्या हुकूमशाहीविरुद्ध टिटोनी १९४८ साली बड पुकारले. प्रत्येक समाजवादी राष्ट्राला स्वत च्या विशिष्ट परिस्थितीनुसार समाजवादाकडे जाण्याचा मार्ग-चोखाळण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे हा हक्क टिटो याना प्रस्थापित करावयाचा होता. कम्युनिस्ट राष्ट्रानी केलेल्या नाकेबदीला धैर्याने तोड देऊन व आपला समाजवाद टिकवून त्यानी हा हक्क प्रस्थापित केला. या काळात अमेरिकेची मदत टिटोनी स्वीकारली. पण त्याच्या बदल्यात आपले स्वातंत्र्य गमावले नाही युगोस्लाव्हिया पाश्चात्य राष्ट्राकडे झुकला नाही. टिटोच्या या अलिप्ततेच्या धोरणामुळेच स्टालिनच्या निधनानतर क्रुश्चेव्ह यानी टिटोशी मिळते घेतले. रशिया-युगोस्लाव्हिया सबध पुन्हा मैत्रीचे झाले. पण या मैत्रीच्या मर्यादा टिटोनी कटाक्षाने पाळल्या. रशियन गटात ते सामील झाले नाहीत. रशियाने युगोस्लाव्हियास साडे तीनशे कोटी रुपयाचे कर्ज दिले आहे. पण टिटोचा स्वत च्या मार्गाने समाजवाद आणण्याचा हक्क रशियानेही आता मान्य केला आहे.

राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद याचा योग्य समन्वय साधण्याच्या प्रयत्नात टिटोना काही समस्या व आव्हानाना तोड द्यावे लागले. डॉ. राधाकृष्णन यानी म्हटल्याप्रमाणे युगोस्लाव्हिया हा सहा प्रजासत्ताके, पाच राष्ट्रे, चार धर्म, तीन भाषा, दोन लिप्या आणि एक राज्य असलेला देश आहे. हुकूमशाहीच्या विकृती किंवा अपप्रवृत्ती यावयास नको असतील तर सत्तेचे विकेंद्रीकरण केले पाहिजे हे टिटो यानी ओळखले. घटक प्रजासत्ताकाना त्यानी अधिक सत्ता दिली. पण त्यातून सर्बियन व क्रोशियन याच्यात सघर्ष निर्माण झाले. युगोस्लाव्हियात सर्बियन ४२ टक्के व क्रोशियन २३ टक्के आहेत. सर्बियनाचे प्रभुत्व असल्याची क्रोशियनानी तक्रार केली. क्रोशियाच्या स्वातंत्र्याची मागणी करण्यात आली. देशाच्या एकतेलाच धोका आणणाऱ्या या दोन्ही चळवळी टिटोनी निष्ठूरपणे दडपून टाकल्या. कम्युनिस्ट पक्षाचे नियत्रण सैल झाल्याने ही परिस्थिती निर्माण झाली होती असे दिसून आल्याने राष्ट्रीय जीवनाच्या सर्व क्षेत्रात कम्युनिस्ट पक्षाचे नियंत्रण पुन्हा प्रस्थापित करण्याच्या सूचना त्यानी दिल्या. आपल्या या धोरणाचे स्पष्टीकरण करताना ते म्हणाले, "लोकशाहीला मार्ग मोकळा होण्यापूर्वीच आपण तिला फार वाव दिला." टिटोना लोकशाही हवी होती पण समाजवाद या राष्ट्राच्या मूलभूत वैचारिक बैठकीवरच आघात करणारी लोकशाही नको होती. टिटो-जिलास सघर्ष यातूनच निर्माण झाला. जिलास कोणतीच विचारप्रणाली मानीत नाहीत. उलट कम्युनिस्ट विचारप्रणालीस निष्ठेने बांधून घेतल्याशिवाय देशाची समाजवादाकडे शिस्तबद्ध प्रगती होणार नाही असे टिटोना वाटते.

समाजवादाला पोषक अशी लोकशाही कशी आणता येईल व या दृष्टीनेही टिटोचे प्रयत्न चालू आहेत. नव्या घटनेतील तरतुदी या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. टिटोच्या नतर सामुदायिक नेतृत्वाकडे सत्ता जाईल. सहा प्रजासत्ताके आणि दोन स्वायत्त प्रात याच्या विधिमडळानी निवडलेल्या सभासदांचे अध्यक्ष मडळ बनेल. ते अध्यक्ष निवडील. पण सत्ता एका व्यक्तीचे हाती नव्हे तर या अध्यक्षमडळात केंद्रित राहील. पार्लमेंटच्या निवडणूक पद्धतीतही बदल करण्यात आला आहे. सध्याच्या प्रत्यक्ष निवडणूक पद्धतीचे जागी पार्लमेंटचे निम्मे सभासद कामगार सघटनामार्फत निवडले जातील व पार्लमेंटात स्वत.ची मते नव्हे तर या सघटनाची मते त्याना माडावी लागतील. याचाच अर्थ या सघटनांना ते बाधलेले असतील. आयाराम-गयारामला तेथे वाव नाही.

कामगारानीच कारखाने चालविणे हा युगोस्लाव्हियातील समाजवादाचा वैशिष्टचपूर्ण प्रयोग आहे. कामगार आपल्या प्रतिनिधीचे एक कामगारमडळ निवडतात. व्यवस्थापकी आणि इतर नोकराना काढणे-नेमणे, पगार, किंमती उत्पादनाचे लक्ष्य ठरविणे, बँकाकडून कर्ज काढणे वगैरे सर्व अधिकार या मडळाना असतात. नोकरशाहीच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण होऊ नये हा या प्रयोगाचा उद्देश. पण तो पूर्णपणे साध्य झालेला नाही. तत्रज्ञाचा नवा वर्ग देशात निर्माण झाला आहे. या तत्रज्ञाना ४००० रुपये म्हणजे मत्र्यापेक्षाही अधिक पगार आहे. सामान्य कामगाराचा सरासरी पगार साडेसातशेच्या आसपास आहे. इतर कम्युनिस्ट देशाच्या मानाने कमाल व किमान पगारातील तफावत युगोस्लाव्हियात कमी आहे. तरीही आणखी समानता कशी आणता येईल असा तेथील नेत्याचा प्रयत्न चालू आहे. □ □

महंमद करीम छगला
यांच्या आत्मचरित्राचा
धावता परिचय

अनुवाद : विनय धुमाळे
लेखांक : दोन

# ROSES IN DECEMBER
# रोझेस इन डिसेंबर
## एम.सी.छागला



१९२२ ते १९४१ च्या दरम्यान मी आपला वेळ वकिली आणि राजकारण यात समान वाटला होता. खरं सांगायचं तर पहिली आठएक वर्षे मला तसं काही खास असं काम मिळालं नाही. माझी पहिली महत्त्वाची केस म्हणजे 'ट्रँक मर्डर केस!' त्याकाळी हा खटला मुंबईत अतोनात गाजला होता. प्रमुख आरोपींच्या बाजूने श्री. सेटलवाड यांनी केस चालवली होती तर आरोपीच्या भावाच्या वतीने मी केस चालवली होती. त्यात निकालात प्रमुख आरोपीला खुनाच्या आरोपाबद्दल शिक्षा झाली. पण माझा अशील मात्र सहीसलामत सुटला. ज्या दिवशी मला पहिली महत्त्वाची केस मिळाली त्याच दिवशी माझं लग्नही ठरलं. माझ्या पत्नीच्या रूपाने जणू माझं भाग्यच उदयाला आलं. त्यानंतर हळुहळु माझी प्रॅक्टीस वाढत गेली व १९४१ च्या सुमारास मुंबईत माझा चांगलाच जम बसला.

आमच्या बार अ‍ॅसोसिएशनच्या कामात पण मी पुष्कळच रस घ्यायचो. मला आठवतं की भारतीय वकील वर्गाचे महर्षी श्री. कांगा यांना नाइटहूड किताब मिळाला व त्या वेळेला त्यांचा सत्कार करायची कल्पना निघाली. त्यावेळी मी, मुळगावकर म्हणून एक वकील होते ते आणि श्री. नाडकर्णी यांनी त्या कल्पनेस सक्त विरोध केला. कांगांना नाइटहूड मिळाली हे काही नवल नव्हते. त्यांची योग्यता आणि कर्तृत्त्व तसंच थोर होतं. पण तरीही ब्रिटिश सरकारने दिलेल्या या पदवीबद्दल वकीलवर्गाने त्यांचा सत्कार करावा हे काही

आम्हाला रुचलं नाही. अर्थात तो ठराव बहुमताच्या जोरावर पास झाला हे सांगणे नकोच. पण पुढे जेव्हा मला हायकोर्टाचे न्यायमूर्ती-पद मिळाले त्यावेळी कागा म्हणाले, की 'आता सात-आठ वर्षात तुम्हालाही नाइटहूड मिळेल.' माझ्या सुदैवाने तोपर्यंत भारत स्वतंत्र झाला व त्या प्रसंगातून मी वाचलो.

### अशा एकेक गंमती

आम्हा अनेक बेकार वकिलाचे त्याकाळी आश्रयस्थान होत, बार ॲसोसीएशनचा जिमखाना. दर सध्याकाळी आम्ही कित्येक जणं तेथे जमत असू व ब्रिज अथवा पोकर खेळत असू. खोटं कशाला बोला थोडफार मद्यपानही त्यावेळी चालत असे.

त्याकाळी आमच्या सुखाची आणखी एक परमावधी म्हणजे क्रिकेटच्या मॅचेस. मला क्रिकेटमॅचेस बघण्याच अतोनात वेड होत. त्याकाळी मॅचेस बघताना घालवलेले क्षण माझ्या आयुष्यातल्या परमावधीच्या सुखाचे आहेत या मॅचेसवरून आठवल. न्यायमूर्ती रागणेकर हे हायकोर्टाचे न्यायमूर्ती होते व त्यानाही क्रिकेटमॅच बघायची अतोनात हौस. पण वकीलवर्ग जसा कोर्टाला दांड्या मारू शकतो तस तर काही न्यायमूर्तींना करता येत नाही. भारत विरुद्ध अर्लस्लेव्हन अशी मॅच. आणि अर्लने आदल्या दिवशी ११ ओव्हर बाउडरीज मारल्या होत्या व त्याला जणू काही जबाब म्हणून सी. के. नायडूनी प्रतिज्ञा केली होती की अर्लच्या ओव्हर बाऊडरीजपेक्षा जास्त बाऊडरीज मी फटकावीन. अशी ती उत्कठा-वर्धक मॅच. तर अशा या दिवशी आपण कोर्टात बसावं व बाहेर नुसता जल्लोश चालावा हे काही त्यांना पटलं नाही पण ते कोर्टाला दाडी कशी मारणार?

झाल. सकाळी कोर्ट भरलं. पहिलीच केस बोर्डावरती होती ती व्यास याची.

रांगणेकरानी व्यासाना विचारलं, 'तुमच्या केसला किती वेळ लागेल?' व्यासानी तत्परतेने उत्तर दिल, 'अख्खा दिवस लागेल, मायलॉर्ड.' 'तुमचे साक्षिदार वगैरे सगळे तयार आहेत का?' रागणेकरानी पुन्हा विचारल. 'होय, मायलॉर्ड.' व्यासानी उत्तर दिल. आली का पचाईत. रागणेकरानी पाहिल की एक सपूर्ण दिवस व्यासाना लागणार मग विनाकारण बाकीच्या वकिलाना ताटकळत कशाला ठेवा. तावडतोब व्यासाची केस सोडून त्यानी त्या दिवशीचा सारा बोर्ड रद्द केला. ते बोर्ड रद्द करतात न करतात तोच व्यास धावतपळत आले व त्यानी रांगणेकराना सागितल, 'मायलॉर्ड, माझा सर्वात महत्त्वाचा साक्षिदारच आज आला नाही.' रागणेकर भडकले त्यानी व्यासाना कोर्टाचा वेळ अशा रितीने फुकट घालवल्या-बद्दल चागलीच तबी दिली. त्यानी व्यासाना सागितलं, 'मी सारा बोर्डसुद्धा रद्द केला आहे. त्यामुळे बाकी कुठलीही कामंसुद्धा होऊ शकत नाहीत.' आणि मोठ्या अनिच्छेने ते कोर्टातून उठले. हे सगळ नाटक झाल्यावर त्यानी पटापट न्यायमूर्तींचा वेश उतरवला व क्रिकेट ग्राऊडवर येऊन अमरनाथ व सि. के. नायडूची बॅटींग बघू लागले. आणि नंतर स्वत.च्या हुषारीवर निहायत खूश होऊन त्यानी आम्हाला सागितल की, व्यासाचा साक्षीदार ऐनवेळी न येण हे सार त्यानी व्यासाबरोबर अगोदरच ठरवल होतं. अशा एकेक गमती.

ही आहे एका जिल्हा न्यायाधीशाच्या कोर्टातील गोष्ट. त्यावेळी वकिलीत माझा चांगलाच जम बसला होता. उत्तर भारतातल एक कोर्ट. कुठल्यातरी आरोपीच्या जामिनाकरता मी खटला चालवीत होतो. माझ्याविरुद्ध होते कलकत्त्याचे प्रख्यात वकील श्री. लँगफोर्ड जेम्स. सकाळी कोर्ट भरायच्या वेळी माझ्या बॅरिस्टरच्या पूर्ण सजलेल्या वेशात मी त्या कोर्टात पदार्पण केले. तेवढ्यातच जेम्सही आले. त्यानी फक्त सूट व टाय घातला होता. गाऊन-बँड्स् वगैरे काहीच नव्हतं. मी त्याना विचारलंसुद्धा, 'आज वकिलाचा पूर्ण वेश तुम्ही परिधान नाही केलात.' ते फक्त हसले व उत्तरले, 'थोडं थाबा आणि मग विचारा. इतक्यात कोर्टात न्यायाधीश महाराज प्रवेश करते झाले. साधी एक शेरवानी व कोट असा त्याचा वेश. मी तर आश्चर्यचकित होऊन पहाताच राहिलो. मुबई हायकोर्टात या गोष्टी मोठ्याच काटेकोरपणे पाळल्या जात. लँगफोर्ड जेम्स माझ्या-कडे मिस्किलपणे पहातच होते. मी आपल्या अभिभाषणाला सुरुवात करणार इतक्यात न्यायाधीश महाराजांची छोटी नात कोर्टात दुड-दुडत्या चालीने प्रवेश करती झाली. मोठ्या प्रेमाने ते एकीकडे नातीचे लाड करीत होते व दुसरीकडे माझ भाषण ऐकत होते. मग मला कळलं की, लँगफोर्ड जेम्स एवढ्या कॅज्युअली कोर्टात का आले ते.

मी वकिलीच्या पेशात रहाव म्हणून अनेकांनी मला मदत केली. एक वेळ तर माझ्यावर इतकी कठीण परिस्थिती आली होती की, ३०० ते ३५० रुपयाची नोकरी मिळविण्याकरता मी पुष्कळच धडपडलो होतो व ती ॲसोसिएटची नोकरी अगदी स्वीकारली पण होती. पण वेलीगकराच्या रूपाने पुन्हा एकदा माझं दैव माझ्या मदतीला धावून आल त्यानी मला आवश्यक त्या पैशाच पाठबळ दिलं. त्याच वेळी सर चिमणलाल सेटलवाड मुबई विद्यापीठाचे उप-कुलगुरू होते. त्यानी मला एक्झॅमिनरशिप दिली. त्याच वेळी मला गव्हर्मेंट लॉ कॉलेजमध्ये पार्टटाइम लेक्चररची जागा मिळाली. या सगळ्या गोष्टीमुळेच प्रारभीच्या काळात मी वकिलीत तग धरू शकलो. होता होता ४१ सालापर्यंत माझा हायकोर्टात चागलाच जम बसला. ४१ मध्ये माझी वकिली फारच जोरात चालली होती. वकिलीच्या निमित्ताने 'कायदा' या विषयाशी माझा फार जवळून सबध आला. कायदा या शाखेविषयी मी जेव्हा विचार करतो तेव्हा मनाला वाटतं की, या शाखेने आपल्याला काय शिकवल नाही.

कायदा म्हणजे एक उच्च प्रकारची मानसिक शिस्तच. मुद्देसूद-पणे, अचूकपणे व तार्कीक दृष्टीने कसा विचार करावा याचे शिक्षण कायदा आपल्याला देतो. प्रत्येक शब्दाला एक विशिष्ट आणि विशिष्टच अर्थ असतो. प्रत्येक शब्दाला त्याला स्वत.चा असा खास सदर्भ असतो. अस्पष्टपणा अथवा घोळ या प्रकाराना कायद्यात स्थान नाही. सार कस रेखीव स्पष्ट असत. कायद्याकरता तर्कशुद्ध विचारसरणी आवश्यक असते आणि स्वत च्या विचाराना तोड द्यायला जे एक धैर्य लागत तेही कायद्याकडूनच आपल्याला प्राप्त होत. पुष्कळ लोकाना हे कळत नाही की, वाईट खटला वकील चालवू कसा शकतो. पुष्कळाना असेही वाटत की, वकिलाच काम म्हणजे खऱ्याच खोट करणं अथवा खोट्याच खर. यावेळी जॉन्सननी बॉसवेलला दिलेलं उत्तर मला तीव्रतेने आठवत. त्यावेळी जॉन्सन

म्हणाले होते की, कुठलाही मुद्दा वकील माडीत असो, तो मुद्दा न्यायाधीशाने निकाल देईपर्यंत खरा अथवा खोटा, चांगला किंवा वाईट ठरूच शकत नाही. त्यामुळे कुठल्याही वकिलाच काम म्हणजे त्याच्या अशिलाकरता जास्तीत जास्त प्रयत्न करणे. प्रत्येक मुद्द्याचा खोलपर्यंत जाऊन विचार करायला देखील वकिलीच शिकवते आणि माझी ही खास दृष्टी पुढे पुढे अनेक वेळेला माझ्या फारच उपयोगी आली. जर मला हे वकिलीन शिकवल नसतं तर पुढे पुढे मला जी अनेक प्रकरणं हाताळावी लागली व त्याच्यावर पटापट निर्णय घ्यावे लागले हे मला कधीच घेता आले नसते.

वकिलीच सार म्हणजे स्वतःच म्हणण न्यायाधिशाप्रत पोहच-वायच व आपल म्हणणं त्याला पटवायच. सबद्ध व असबद्ध यामधला फरक जाणवणं हे मला वाटत वाकिलीतल्या यशाच गमक आहे. वकिली हा एक अत्यत महत्त्वाचा व्यवसाय आहे. त्याची महती म्हणजे हा व्यवसाय सपूर्णपणे स्वतत्र आहे. कोणाची बाधिलकी ही या व्यवसायाला मजूर नाही. त्याचप्रमाणे सत्य शोधण्याच्या प्रक्रिये-मधला वकील हा एक फार मोठा घटक आहे. वकिलाने अशिला-करीता भाडताना आपली बुद्धी व कसब पणाला लावल पाहिजे. अर्धवट तयारी करून वाग्युद्धात उतरण मला मुळीच मजूर नाही. कार्सन या प्रख्यात इग्लीश वकिलाबद्दल नेहमी म्हटले जायचे की ज्या ज्या माणसाचा त्याने बचाव केला त्या प्रत्येकाला त्यानी सभ्यतेचा जणू पुतळाच बनवला व ज्या ज्या मुद्याकरीता तो भाडला तो तो मुद्दा म्हणजे न्यायातला न्याय्य मुद्दाच अस लोकांना जणू त्यान भासवल. या सगळयाचा विचार करता परत मी मूळ मुद्याला येतो की वकिलीने मला काय शिकविल नाही. □

१९४१ मधल्या फेब्रुवारीमधला एक रविवार. मी नित्याप्रमाणे कागाच्या दरबारात बसलो होतो. इतक्यात मुबई हायकोर्टाचे सर-न्यायाधीश जस्टीस बेमाऊट याचा मला फोन आला. त्यानी मला भेटायला बोलावल होत. त्याप्रमाणे मी त्याच्या भेटीला गेलो व बोलता बोलता त्यांनी अचानकपणे मुबई हायकोर्टाचे न्यायमूर्तीपद मला देऊ केले. तसा हा एक प्रकारे माझा सन्मानच होता यात काही शका नाही. पण जर ते मी स्वीकारले असते तर माझ्या इतर साऱ्या गोष्टी मला बद कराव्या लागल्या असत्या. त्यामुळे मी त्यांच्याकडे विचार करण्यासाठी वेळ मागून घेतला. त्यांनी मला हेही सागितले की मला न्यायमूर्तीपद मिळावे म्हणून ते सरकारशी भाडलेदेखील होते. सरकारच्या मते राजकीयदृष्ट्या मी बराच चळवळया होतो. पण बेमाऊटनी सरकारला कळवल की त्याना छगला विधिज्ञ म्हणूनच ज्ञात होते व त्यामुळे माझ्या इतर काही धडामोडीसबधी दखल घ्यायची त्यांना (बेमाऊट) जरूर नव्हती.

यासबधी साहाजिकच मी माझ्या पत्नीशी बोललो. तिने तर चटकन याला होकार दिला. कारण अजून जर मी वकीली करीत राहिलो असतो तर तिच्या वाट्याला मी फारच थोडा आलो असतो. पण जर मी या गोष्टीला माझा नकार कळविला असता तर माझ्या सार्वजनिक जीवनावर जणू पडदाच पडणार होता.

तस बघायला गेल तर त्यावेळी जे माझ राजकीय जीवन होतं त्यात एक प्रकारच मला नैराश्यच आल होत. हिंदू मुसलमानाचे तणाव विकोपाला गेले होते. त्यातच जिनानीही द्विराष्ट्रवादाची कल्पना मोठ्या जोमाने माडली होती. आमच्यासारखे राष्ट्रवादी मुसलमान सपूर्णतया अलग पडले होते. त्यांच्याकडे कोणीच लक्ष देत नव्हते. सारेजण जिनाचीच मनधरणी करीत होते. थोडक्यात म्हणजे राष्ट्रवादी मुसलमान प्रवाहाबाहेर फेकले गेले होते. या साऱ्या निराशाजनक घटनाच्या पार्श्वभूमीवर माझं राजकीय भविष्य देखील तितकस काही उज्वल दिसत नव्हत. या साऱ्या गोष्टी मी विचारात घेतल्या व ठरवलं की न्यायमूर्तीपद स्वीकारायचं

## न्यायमूर्तीपद

पण हे सारं मी न्यायमूर्ती व्हायच्या आधी अगदी एक आठवडाभर अत्यत गुप्त राहिलं. मधल्या काळात माझी वकिली चालूच होती जस्टीस वाडिया निवृत्त झाल्यावर कोण येणार म्हणून साहाजिकच चर्चा चालली होती. अनेक नावे घोळली जात होती, पण त्यात आश्चर्याची गोष्ट अशी की माझ नाव कोणीच घेत नव्हत. एखाद्या वकिलाच नाव या सदर्भात ऐकून मी मोठ्या बेफिकीरपणे म्हणून जायचो, असेल बुवा. पण ऑगस्ट चारच्या सुमाराला नोटिफिकेशन निघायच्या आधी एक-दोन दिवस काम स्वीकारायच मी बद केल. साहाजिकच सॉलिसिटर्सनी मला विचारल, पण त्यालाही मी मोघम उत्तर दिल, 'मी स्वतत्र पेशाचा मनुष्य आहे त्यामुळे कधी काम करायच अथवा नाही हे ठरवायचा मला पूर्ण हक्क आहे.' यावरून मीच बहुतेक न्यायमूर्ती होणार असं अनेकाना वाटू लागल. अनेक लोकाकडून माझे कामाचे पैसे यायचे होते. जेव्हा त्यांना कळल की मी हायकोर्ट जज्ज होणार—ताबडतोब माझ्या कामाचे पैसे मला मिळाले. धडाधड माझ्याकडे चेक्स येऊ लागले. तसे सगळेच सॉली-सिटर्स पैसे देण्याच्या बाबतीत फार ढिले होते. पण एकदा का त्यांना कळल की आता मी हायकोर्ट जज्ज होणार आहे मग मात्र त्यांच्या तत्परतेला जोड नव्हती.

मला आठवत की, मी जज्ज म्हणून बसायच्या आदल्या दिवशी अॅसोसिएटने दुसऱ्या दिवशीच्या कामाचे कागद मला वाचण्याकरता म्हणून आणून ठेवले. मी त्याला सागितल की, 'खटल्याच्या आदल्या दिवशीच जर कागदपत्र वाचायचे असते तर मी वकील म्हणूनच राहिलो असतो. न्यायाधिशाचं काम दोन्ही बाजूच्या वकीलाच म्हणणं ऐकून घेतल्यावरच. त्याच्या आधी नाही. कारण मला वाटतं न्यायाधिशाने आदल्या दिवशी कागदपत्र वाचल्याने नाही म्हटलं तरी त्याच्या मनावर परिणाम हा होतोच.' माझ्या जज्ज म्हणून साऱ्या कारकीर्दीत मी खटल्याचे कागदपत्र कधीच आधी वाचले नाहीत. मन अत्यत मोकळं ठेवलं.

त्याचप्रमाणे न्यायमूर्ती म्हणून मी पाळलेल्या दुसऱ्या एका प्रघाता-बद्दल मला सांगावस वाटत तो म्हणजे मी दिलेल्या निकालाबाबत. मी खटल्याचा निकाल कधीच राखून ठेवला नाही. दोन्ही बाजू पूर्णपणे ऐकून घेतल्यावर मी तावडतोब निकाल देऊन टाकायचो. पुष्कळ वेळेला माझ्यावर अगदी कसोटीचे प्रसग आले तरी मी या निश्चयापासून ढळलो नाही. न्यायमूर्ती म्हणून मला आणखी एक सांगावसं वाटत ते म्हणजे माझ्या ज्युनीअर्स बाबतच्या दृष्टीकोणा बाबत. जेव्हा हे नवखे वकील कोर्टात प्रथमच पदार्पण करतात

किंवा अजून ज्युनीअर्स असतात तेव्हा न्यायाधिशांकडून त्यांना आत्यंतिक सहानभूतीची जरूर असते. मी असे पुष्कळ न्यायमूर्ती पाहिले आहेत की एखादा मुद्दा जर मुरब्बी वकिलाने माडला तर ते शातपणे ऐकून घेतात पण तोच जर नवख्या वकिलाने मांडला तर सरळसरळ फेटाळून लावतात. हा दृष्टिकोन साफ चुकीचा आहे. नवख्याना सतत मदतीचा हात व प्रशसेची थाप देण्यात मला नेहमीच मोठ समाधान वाटल आहे.

एक थोडस विषयातर करतो.

सुप्रीम कोर्टातसुद्धा मी अनेक वेळेला बघतो की समजा एखाद्या घराची केस चालली आहे व खोलीचे भाड आहे ५० रु. तर पुष्कळ वेळेला सुप्रीम कोर्टात अस म्हणण्यात येत की एवढ्या क्षुल्लक कामाकरता या सुप्रीम कोर्टाचा वेळ घेतला जाऊ नये. मला वाटत हे साफ चूक आहे. उलट ५०० ते ६०० रु. भाड भरणाऱ्या माणसाला सुप्रीम कोर्टाच्या मदतीची जरूरच भासणार नाही. कारण एक जागा गेली तर तो दुसरी जागा घेऊ शकेल. पण ५० रु. भाड भरणारा मात्र अक्षरश: रस्त्यावर फेकला जाईल.

## जॉन बेमाऊंट आणि स्टोन

मी न्यायमूर्ती असताना दोन सरन्यायाधिशाच्या हाताखाली काम केल. पहिले सर जॉन बेमाऊट व दुसरे म्हणजे सर लिओनार्ड स्टोन. सर जॉन माझ्याशी नेहमीच अगदी आपुलकीच्या भावनेने वागले. एक व्यक्ती व विधिज्ञ म्हणून मला त्याच्याविषयी सदैव आदर वाटत आला. त्याची बुद्धी कुशाग्र होती यात शकाच नाही. एखादा खटला चालू असताना वकिलाचा एखादा मुद्दा पुरा माडून व्हायच्या आतच तो त्यानी जाणून घेतलेला असे. मग अशावेळी जर परत तोच मुद्दा वकील ठसवायचा प्रयत्न करू लागला तर त्या मधल्या काळात ते चक्क लहानशी डुलकीसुद्धा घेत.

दुसरे म्हणजे सर लिओनार्ड स्टोन. एकदम चांगला माणूस यात शकाच नाही. पण अगदी खरच सागायच म्हटलं तर त्याच कायद्याच ज्ञान तस यथातथाच होत. सर जॉनना हिंदुस्थानची जेवढी पार्श्वभूमी ज्ञात होती व कायद्याच जेवढ सूक्ष्म ज्ञान होत तेवढ काही सर लिओनार्डना नव्हत.

त्यावेळी माझे सहकारी म्हणजे जस्टीस कनिया. ते अत्यत कुशाग्र बुद्धीचे होते. कुठलाही मुद्दा त्याच्या ध्यानात क्षणार्धात येत असे. दुसरे म्हणजे जस्टीस दिवेटिया. दिवेटिया कनियाएवढे धारदार बुद्धीचे नसले तरीही त्याच व्यवहारज्ञान मात्र अजोड होत. बावडेकर हे एक आय. सी. एस. जज्ज होते. त्याचा आणि माझाही ऋणानुबंध पुढे चागलाच जमला. त्याच कायद्याच ज्ञानही अत्यत सूक्ष्म होत व इतर आय. सी. एस. जज्जेपेक्षा ते फारच सहृदय होते. पण त्याची एक खोड होती ती म्हणजे खटला चालू असताना वकिलाच्या बरोबरीने बोलण्याची. एखादा मुद्दा जर त्याना पटला नाही तर तेच एखाद्या वकिलाची भूमिका घेऊन त्या वकिलाला मुद्दा पटवून देण्याची कोशीस करीत की त्याचाच मुद्दा कसा बरोबर आहे. मी त्याना पुष्कळ वेळेला समजावीत असे की वकिलाला त्याचं म्हणण माडण्याकरता अशिलाकडून पैसे मिळत असतात, त्यामुळे निदान अशिलाच्या समाधानाकरता तरी वकिलाला मुद्द्यामागून मुद्दे माडावेच लागतात. भले त्यातले कित्येक त्याला स्वत:लाच पटलेले नसते. पण नाही, बावडेकरांनी कधी वकिली केली नसल्यामुळे त्यांच्या ध्यानात या गोष्टी काही यायच्या नाहीत. आणि कोर्टात ते वकिलाच्या बरोबरीने वादविवाद करायचे, एकदा दप्तरीच काम बावडेकरासमोर लागल होत. तर मी सहज दप्तरीना (भारताचे भूतपूर्व अॅटर्नी जनरल) विचारल की तुमच्या खटल्याला किती वेळ लागेल. दप्तरीनी शातपणे सागितल, 'मला फारतर अर्धा तास लागेल, बावडेकराना किती लागेल याची काही मला कल्पना नाही.' असे हे माझे सहकारी न्यायाधीश, ज्याच्या सहवासात आल्यामुळे माझ जीवन पुष्कळच समृद्ध झाल. ◘

१५ ऑगस्ट १९४५ रोजी मुबई हायकोर्टाचा सर न्यायाधीश म्हणून लिओनॉर्ड स्टोन याच्याकडून मी सूत्रे हातात घेतली. खरं तर ते भारत स्वतत्र झाल्यावर देखील मुबई हायकोर्टाचे सरन्यायाधीश म्हणून राहू शकले असते. पण तेच मला म्हणाले की, "स्वतत्र भारतात हायकोर्टाचा सरन्यायाधीश म्हणून एका ब्रिटिशाने काम करणे योग्य होणार नाही."

मी पहिलाच भारतीय, सरन्यायाधीश म्हणून नेमला गेलो असल्याने त्या जागेची जबाबदारी मला पूर्णपणे ठाऊक होती. या ठिकाणी मला अत्यत नम्रपणे सागावस वाटत की, सरन्यायाधीश म्हणून अकरा वर्षे मी सूत्रे हाताळली. त्यात माझी निष्ठा व कार्यशक्ती हायकोर्टाकरता पणाला लावली. माझ्या ११ वर्षांच्या काळात एकही दिवस मी अनुपस्थित राहिलो नाही. त्यामुळेच तर माझी बायको चेष्टेने म्हणायची देखील, "हायकोर्टात जास्ती वेळ बसलात तर तुम्हाला पैसे वगैरे जास्त मिळतात की काय ?"

मी सरन्यायाधीश म्हणून काम सुरू केल्यावर मला काही महत्त्वाचे प्रश्न सोडवावे लागले. नुकतच स्वातत्र्य मिळाल असल्याने न्यायासन व शासन याच्यातले सबध नीट प्रस्थापित झाले नव्हते. शासनाने न्यायासनाच्या हक्कावर एखादवेळेला अतिक्रमण करण्याची देखील शक्यता होती. अशा वेळी कुठल्याही सरकारला जास्तीत जास्त सस्थाना स्वत:च्या पखाखाली घेण्याची महत्त्वाकांक्षा असते आणि विशेषत: न्यायासनासारख्या स्वतत्र सस्थेला तर आवर्जून. त्या दृष्टीने मी काही पावल ताबडतोब उचलली.

मी त्यावेळचे मुख्यमत्री श्री. खेर याना सुचवलं की, हायकोर्ट व मुबई सरकार याच्यामधला विचारविनिमय व व्यवहार हा सरन्यायाधीश व मुख्यमत्री याच्या पातळीवरूनच चालावा. फार तर गृहमत्री, पण त्याहून दुसऱ्या कुठल्याही व्यक्तीचा या प्रश्नातला सपर्क अयोग्य ठरेल.

दुसर त्याना मी अस सागितल की, जेव्हा हायकोर्ट जज्जची नेमणूक होते तेव्हा पुढाकार हायकोर्टाचा असण जास्त योग्य. सरकारचा त्यात फार भाग असू नये. कारण नि:पक्षपाती न्यायाधीश नेमण्याकरता हायकोर्ट सरकारपेक्षा जास्त सोयिस्कर माध्यम आहे. कारण हायकोर्टावर काही सरकारसारखे दबाव येऊ शकत नाहीत.

या वरील प्रथेमुळेच माझे व श्री. मोरारजीभाई देसाईंचे पुष्कळ खटके उडाले. जरी खेर त्यावेळी मुख्यमत्री होते तरी कर्तुम अकर्तुम मोरारजीच होते.

आमचा पहिलाच खटका लाड नावाच्या गृहस्थावरून उडाला. वास्तविक लाड हे लीगल रिमेम्बन्सर होते. हायकोर्ट जज्जची एक जागा रिकामी झाली होती. त्या जागेकरता मी लाडाहून एका ज्युनिअर अशा जिल्हा न्यायाधीशाच नाव सुचवल. मोरारजींनी तावडतोब विचारलं की, 'लाड हे सिनिअर असून देखील त्यांना का म्हणून डावलण्यात आल आहे ?' मी त्यांना सागितले की, 'लाड हे कायद्याच्या शासकीय खात्यात असल्याने त्यांना हायकोर्ट जज्ज नेमण्यापूर्वी जिल्ह्यातल्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.' त्यावर मोरारजी भयकर भडकले व त्यानी मला तडकावल की, 'असेच जर प्रकार घडणार असतील तर रिकाम्या जागेवर कोणीच नेमण्यात येणार नाही.' मीही त्याना शांतपणे सांगितले की, 'एक न्यायाधीश कमी असतानासुद्धा हायकोर्ट चालवण्यास मी समर्थ आहे.' मग लाड हे भारत सरकारच्या दुसऱ्या कुठल्यातरी जागेवर जाईपर्यंत हा झगडा चालूच होता. पण तत्त्वत: मी बरोबर असल्याने पडते घेतले नाही.

### मी फक्त कायद्याच्या ज्ञानाचा विचार करतो

दुसरा आमचा खटका उडाला तो म्हणजे एका वकिलाच्या नेमणुकीच्या वेळी. न्यायाधिशाच्या जागेकरता मी एका वकिलाच नाव सुचवल. तो होता हिंदुमहासभेचा कार्यकर्ता. तावडतोब मोरारजीकडून मला विचारण्यात आल की, 'न्यायाधिशाच्या जागेवर एक हिंदुमहासभावाला—काहीतरी भलतच काय ?' मी मोरारजीना तावडतोब कळवले की, 'एखाद्या वकिलाला न्यायाधीश म्हणून नेमताना मी त्याच्या फक्त कायद्याच्या ज्ञानाचा विचार करतो, त्याच्या राजकीय मताचा नाही. कारण वकिली हा एक स्वतत्र व्यवसाय आहे. त्यामुळे त्याची स्वत.ची मत बाळगण्याचा वकिलांना पूर्ण हक्क आहे. जोपर्यंत माझी खात्री आहे की, होणारा न्यायाधीश राजकारण कोर्टात आणीत नाही तोपर्यंत वकिलाच्या पूर्वायुष्याची अथवा पूर्वमताची मी मुळीसुद्धा दखल घेणार नाही.'

एकदा एका असिस्टट जज्जच्या नेमणुकीवेळी देखील एका सिनिअर मुसलमानाच्या ऐवजी मी एका हिंदू माणसाला असिस्टट जज्ज नेमले. त्याही वेळेला मोरारजी माझ्यावर उखडले. पण परत मी त्याना सागितल की, 'न्यायाधीश नेमताना मी त्याच्या कायद्यातील पात्रतेचाच फक्त विचार करतो. जातपात अथवा धर्म मी मुळीसुद्धा ध्यानात घेत नाही.'

जेव्हा मोरारजी देसाई केंद्रीय मत्री म्हणून दिल्लीला गेले तेव्हा त्याच्या सत्कार समारभात मी भाषण केले त्यावेळी मी म्हणालो, "की मोरारजीच्या कारकीर्दीत हे घडल की एक मुसलमान सरन्यायाधिशाचा एका मुसलमानाला जज्ज म्हणून नेमण्यास विरोध करीत होता तर त्याच्या नेमणुकीकरताच एक हिंदू मुख्यमत्री नेटाने झटत होता."

मोरारजी हे एक अत्यत कणखर व कर्तबगार शासक होते यात काहीच शका नाही. जातीय विद्वेषापासून ते सपूर्णतया मुक्त होते. जरी पहिल्यादा आमचे पुष्कळ मतभेद होते तरीही नतर आम्ही चागले मित्र झालो.

माझ्या सरन्यायाधिशाच्या कारकीर्दीत मी असख्य निकाल सरकारच्या विरुद्ध दिले. कायद्याच्या काही तरतुदीनुसार एखाद्या माणसाला विनाचौकशी अटकेत ठेवायचा सरकारला अधिकार असतो आणि आणिबाणीच्या वगैरे वेळी कमीतकमी विरोधाचा मार्ग म्हणून सरकार अनेक लोकाना विनाचौकशी अटकेत डाबून ठेवीत असे. पण त्यामुळे सामान्य नागरिकाचे मूलभूत हक्कच धोक्यात येत असत, त्यामुळे सरकारी ऑर्डरमध्ये मला थोडी जरी वाट मिळाली की वर सागितलेल्या पैकी खटल्यात मी तावडतोब त्या माणसाची सुटका करीत असे. त्यामुळे मोरारजीची खात्रीच पटली होती की मुद्दामच सरकारविरोधी निकाल देतो. एकदा एका जेवणसमारभात घडलेला प्रसंग मला चागलाच आठवतो. त्या दिवशीच सकाळीच मी एका खटल्यात सरकारविरोधी निर्णय दिला होता आणि मला वाटत की सरकारच्या दृष्टीने तो खटला बराच महत्त्वाचा होता. मोरारजी पण जेवणाच्यावेळी हजर होते. मला पाहताक्षणीच ते म्हणाले 'तर परत एकदा तुम्ही सरकारविरोधी निर्णय दिला आहे. मला वाटत छगला तुम्हाला सरकारविरोधी निर्णय देण्यात कसलातरी एक विचित्र आनद होतो.' मी चांगलाच भडकलो. मी तेथल्या तेथे त्याना तडकावले की, 'सरकारची खुशमस्करी करण्यास्तव अथवा केवळ सरकारचच सरक्षण करण्यास्तव माझी नेमणूक झाली नसून एखाद्या सामान्य नागरिकाच्या हक्काची जोपासना करण्यासाठी माझी नेमणूक झाली आहे. त्यामुळे जिथे जिथे सरकार चुका करील अथवा अन्याय्य मार्ग आचरील तेथे तेथे अत्यत कठोरपणे ती कृती मी हाणून पाडीन.' कसं कोण जाणे पण आमच हे सार सभाषण मुबईच्या 'करट' साप्ताहिकात त्यावेळी प्रसिद्ध झाल. मला कोणीतरी सागितल की याकडे पडीत नेहरूचं देखील लक्ष वेधण्यात आले. मला सागायला खेद होतो की या प्रकरणानतर माझे व नेहरूचे सबध बिघडले होते. नेहरू माझ्याबाबतीत उदासीनच झाले होते.

दारूबदीच्या कायद्याविषयी देखील मला अप्रीती होती, पण जाहीरपणे त्या विषयी मी कधीच असतोष व्यक्त केला नाही. पण खेर अथवा मोरारजी मला भेटले तर त्याबाबतची नापसती मी त्यांना जरूर सागत असे. माझ्यामते ज्या कायद्याची अमलबजावणी करता येत नाही त्याचा काहीच उपयोग नसतो व या दारूबदीमुळे पोलीस खात्यात देखील पुष्कळच लाचलुचपत चालत असे. पण या साऱ्याचा मोरारजीवर काहीच परिणाम होत नसे. कारण दारूबदी हे मोरारजीचे खास अस क्षेत्र होत जिथे कोणाचेच काही चालले नसते.

एकदा कुणाच्या तरी निधनानिमित्त सचिवालय बद ठेवण्याचा आदेश दिला गेला. पण आमच हायकोर्ट मात्र मी चालूच ठेवलं. यावर मोराजीनी मला विचारल की, 'मी सरकारी आदेशाचे उल्लघन का केले—त्यावर मी त्याना सागितले की, हायकोर्ट बद ठेवायचे का उघडे हे पूर्णपणे माझ्या अखत्यारीतले आहे. आणि कुठल्यादिवशी हायकोर्ट बद ठेवायचे हे मला चागले कळते आणि मिस्किलपणे मी पुढे म्हणालो की, 'नाहीतरी सचिवालय हल्ली जरूरीपेक्षा अधिक बद असते आणि मला वाटत हायकोर्टात तो पायडा पाळायलाच पाहिजे अस नाही.'

माझा आणि चव्हाणाचा मोरारजीइतका काही सबध आला नाही. पण शपथविधीच्या वेळी ते म्हणाले 'न्यायदान व हायकोर्ट

या बाबतीत छगला मी तुमचा सल्ला नेहमीच शिरोधार्य मानीन.' आणि त्याच्याबद्दल हे सांगितलंच पाहिजे की दिलेल्या वचनाला ते सदैव जागले माझ्या कामात त्यांनी कधीच ढवळाढवळ केली नाही.

मला वाटतं सरन्यायाधिशाच्या भूमिकेवरून मी पुष्कळच सांगितल आहे. पण मला एक मात्र इथे नमूद केल पाहिजे की मुंबईचा वकीलवर्ग माझ्याशी अत्यंत सामजस्याने व एकोप्याने वागला. मुंबईच्या जनतेने देखील माझा नागरी सत्कार केला. अनेक ठिकाणाहून स्तुतिसुमनाची माझ्यावर खैरात करण्यात आली. त्या सगळ्याना मी कितपत पात्र होतो कुणास ठाऊक.

महाराष्ट्राचे अ‍ॅडव्होकेट जनरल श्री. सिरवाई यानी मला लिहिलेल्या पत्रातला उतारा मोठ्या अभिमानाने मी इथे उद्धृत करतो. ते लिहितात–

ज्याप्रमाणे कागांच्या चेंबरमध्ये सूर्यप्रकाश सदैव विलसत असे त्याचप्रमाणे तुमच्याही कोर्टात सूर्यप्रकाश नेहमीच विराजत असे. सगळ्या लोकाची तुमच्या कोर्टाबद्दल खात्री आहे की या कोर्टात सत्य हुडकण्यासाठी अस्तित्वात असलेले सगळे मार्ग धुडाळण्यात येतील. सर्वांना खात्री आहे की असत्याचा तुमच्या न्यायालयात कधीच विजय होणार नाही. सरकारने मला (सिरवाईंना) बहाल केलेल्या कुठल्याही मानमरातबापेक्षा तुमचे कोर्ट येथे आहे हा आधार मला जास्त श्रेष्ठ वाटतो, जोपर्यंत वकिलाची व अशिलांची स्मृती जागृत असेल तोपर्यंत तुमचे कोर्ट त्याच्या सदैव स्मरणात राहील यात काहीच शका नाही.

तुमचाच स्नेहांकित
एच. एम. सिरवाई

## राज्यपाल

ऑक्टोबर चार १९५६ ला मला नेहरूचं एक पत्र आलं. त्यानी लिहिल होत की मी मुंबईच्या गव्हर्नरपदाची सूत्रे हाती घ्यावीत. कारण १५ तारखेला हरेकृष्ण मेहताब राज्यपालपद सोडणार होते आणि नियुक्त राज्यपाल श्रीप्रकाश नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यातच सूत्रे हाती घेणार होते, त्यामुळे मधल्या या काळात मी ती सूत्रे सांभाळावीत अस त्याच मत दिसल.

थोडे दिवसच जरी मी राजभवनमध्ये होतो तरी माझं भाग्य चागल होत. या काळात अनेक राष्ट्राचे प्रमुख व महत्त्वाच्या व्यक्ती राजभवनवर येऊन गेल्या. या सर्व व्यक्तीत नामोल्लेख करण्यासारखे पहिले म्हणजे चौ. एन. लाय. चीनचे पतप्रधान. त्यावेळचे दिवस हिंदी चीनी भाई भाईचे होते. त्यामुळे माझे व त्याचे सबध अत्यत जिव्हाळ्याचे बनले. मी आत्तापर्यंत अनेक देशांचे पतप्रधान वा अन्य महत्त्वाच्या व्यक्ती जवळून पाहिल्या असतील पण चौ एवढे कर्तबगार आणि मुरब्बी राजकारणी मात्र विरळाच. अत्यंत सुसस्कृत व आदबशीर अस त्याच व्यक्तित्व होतं. त्याची विनोदबुद्धी सुद्धा अत्यत तीक्ष्ण होती. त्यांच्या कार्यक्रमाची पत्रिका आम्ही ठरवली त्यात त्याची आरे कॉलनीला भेट ठरवली. चौ म्हणाले की, 'केवळ गुरं पाहण्यापेक्षा मला माणसाना भेटण अधिक आवडेल! विशेषत: कलावत अभिनेते वगैरे, वगैरे.' मी त्याना "आरे हे केवळ भारतातच नव्हे तर साऱ्या आशियात कसे वैशिष्ट्यपूर्ण आहे हे पटवायचा प्रयत्न केला आणि असंही म्हणालो की, 'कलावंत आपल्या भेटीसाठी कधीही येतील.' एवढ्या माझ्या आग्रहाखातर शेवटी त्यांनी माझी इच्छा मान्य केली. मीही वचनाला जागलो आणि त्याची इच्छा पुरी केली. सध्याकाळी राजभवनमध्ये कलावताचा मेळावा ठरवला, त्यात त्यानी आवारा चित्रपटातले एक गाणे म्हणायची एका सुस्वरूप नटीला विनती केली. तिनेही ताबडतोब गाण म्हटले आणि मोठ्या रसिकतेने चाऊनी तिला दाद दिली.

त्यानतर आंतरराष्ट्रीय परिस्थितीविषयीही आमचं बोलणं झाल. विशेषत युनोमधल्या चीन प्रवेशाबाबत. त्यावेळी चाऊ म्हणाले, की 'युनो प्रवेशाकरता चीन कोणाकडेही भीक मागणार नाही. एक दिवस असा येईल की, साऱ्या जगाला चीन युनोमध्ये हवा असेल. चीनपाशी तेव्हढी थाबायची तयारी आहे.' त्याच बोलणं किती दूरदृष्टीच होत हे आपल्याला अलिकडच्या घटनावरून दिसून येईलच. अर्थात भारताने चीनच्या यूनो प्रवेशाकरिता जे खास प्रयत्न चालवले होते त्याबद्दल त्यानी भारताचे आभार मानले.

दुसरी उल्लेखनीय व्यक्ती म्हणजे इथिओपिओचे राजे हेले सिलासी. अत्यत देवभोळा व सरळमार्गी मनुष्य. राजा सॉलोमन व शीबाराणीचे ते वशज असल्याबद्दल त्याना अभिमानही होता. मी त्यांना पुण्याला एन. डी. ए., नॅशनल केमिकल लॅबोरेटरी व पेनीसिलीनची फॅक्टरी बघायला घेऊन गेलो. या साऱ्या सस्था पाहून ते फारच प्रभावीत झाले. त्याचवेळी एन. डी. ए. मध्ये काही इथिओपीअन विद्यार्थीदेखील शिकत होते. मी त्यांना त्याच्या राजाच्या भेटीसाठी बोलावले. ते आले पण येताक्षणीच त्यानी राजेसाहेबाचे पाय धरले. मला कोणी कुणाचे पाय धरलेले मुळीच आवडत नाही. माणसाची समानता व शान यावर त्याने घाला बसतो अस माझ मत आहे.

अर्ल आणि काउटेस ॲटली हेही माझे अतिथी होते. त्याच स्वागतपण अत्यत उत्साहाने झालं. भारताला शाततेने स्वातत्र्य द्यायच धैर्य याच माणसाने दाखवलं होत.

माझ्या राजभवनमधील वास्तव्यात येऊन गेलेल्या आणखी दोन महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजे दलाई लामा व पंचेन लामा. जरी दलाई लामा अतिशय श्रद्धाळू व देवभक्त असले तरीही त्याच व्यक्तीमत्व अतिशयच आकर्षक आहे. एका धर्मासनाचे प्रमुख म्हणून मखरात बसून त्यानी कधीच केवळ व्याख्याने झोडली नाहीत. ते सर्वसामान्याप्रमाणेच राहिले. पचेन लामा मात्र त्यामानाने धर्मगुरूपेक्षा मुरब्बी राजकारणी वाटले.

ते येणार म्हणून मला दिल्लीकडून दोन सूचना आल्या, एक म्हणजे ते कडक शाकाहारी आहेत व दुसरी म्हणजे शक्यतो ते हजर असतील त्या समारभाला स्त्रिया न बोलावलेल्या बऱ्या. त्याना खपत नसत म्हणे.

पहिल्या सुचनेनुसार मी शाकाहारी भोजन 'थाळी' तयार ठेवली पण या सरकारी खान्याच्या वेळी एकतरी स्त्री हजर राहाण अत्यावश्यक होत, ती म्हणजे माझी बायको. मी त्याच्या बाजूलाच बसलो. हो उगाच त्यांच्या धार्मिक कृत्यात काही खड नको. तरी हजर असलेल्या स्त्रियासमोर आमचं जेवण व्यवस्थित झाल. पण खरा धक्का मला दुसऱ्या दिवशी सकाळी बसला. माझा ए. डी. सी.

सांगत आला की दलाई लामा न्याहारीला किडनी व सॉसेजीस मागत आहेत. आपल्या पाहुण्याविषयींचं दिल्लीचं ज्ञान हे असं होतं.

चिनी वकिलातीकडून त्यांच्या सन्मानार्थ खास खाना देण्यात आला त्यावेळी अनेक स्त्रिया त्या ठिकाणी उपस्थित होत्या. आपल्या-भारतीय पद्धतीनुसार साऱ्या स्त्रिया त्यांच्याशी हात जोडून नमस्कार करायच्या पण हे मात्र चक्क हस्तांदोलनदेखील करीत होते. माझ्या सेक्युरीटी ऑफिसरने सांगितलेली ही गोष्ट.

राजभवनमधल्या माझ्या कारकीर्दीतली सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे द्वभाषिक राज्याची स्थापना. ३१ ऑक्टोबर १९५६ च्या मध्यरात्रीच्या काही क्षणानंतर या द्वैभाषिक राज्याचा जन्म झाला. मी यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांना या द्वैभाषिक राज्याचा मुख्यमंत्री म्हणून नेमले. १ नोव्हेंबरच्या राज्यपालांच्या आभिभाषणात मी म्हणालो की, 'आजवर मुंबई राज्याचं शासन नीतीमत्तेमुळे व कार्यक्षमतेमुळे साऱ्या देशात अग्रेसर असं ठरलं आहे.' आणि पुढे म्हणालो, 'आजवर हे राज्य पुढे आणण्याकरता अनेक लोकांचे श्रम कारणीभूत ठरले आहेत. या पुढेही महाराष्ट्रीयन व गुजराथी जनता आपसातील मतभेद मिटवून राज्याच्या उन्नतीकरता झटतील अशी माला आशा आहे. आपल्या वैविध्यातच आपल्या एकतेची सूत्रं आहेत असंही मी सांगितलं.

पण माझ्या आवाहनाला काही फारसा प्रतिसाद मिळाला नाही हेच खरं. कारण आपल्या सर्वांना ठाऊक आहे की थोड्याच अवधी-नंतर महाराष्ट्र व गुजराथ ही देखील विभक्त राज्ये बनली. मला फाळणीचा तीव्र तिटकारा आहे पण तेच बघणं माझ्या नशिबी आलं आहे. पाहिली आपल्या देशाची फाळणी, मग या विस्तीर्ण मुंबई राज्याची फाळणी. नंतर पंजाबची फाळणी. माझं ठाम मत आहे की फाळणीने प्रश्न मुळीच सुटत नाहीत. प्रांतीकवाद त्यामुळे निष्कारण चेतवला जातो व त्यामुळे नेहमीच राष्ट्रीय एकात्मता एका कोपऱ्यात ढकलली जाते. आपल्या देशात जे काही सध्या घडत आहे त्यावरून माझ्या बोलण्याचं प्रत्यंतर नक्कीच येईल.

एका राज्याची भरभराट म्हणजे आपल्या देशाची भरभराट हे आपण विसरून जातो, त्यामुळेच तर पोलाद कारखाने, खत कारखाने कुठे उभारावेत यावरून आपण झगडत असतो.

दि. १० डिसेंबरला मी नियोजित राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांच्याहाती राज्यपालपदाची सूत्रे दिली व माझ्या हायकोर्टाच्या नेहमीच्या परिचित वातावरणात परत गेलो.

[क्रमशः]



मौलाना अबुल कलम आझादांनी नेहरूंना ठणकावले की ज्या मंत्र्यांच्या कारभारावर चौकशी मंडळाने टीका केली आहे अशा मंत्र्याला अधिकारपदावर ठेवणं हा राष्ट्रीय पातळीवरचा भ्रष्टाचार ठरेल. यावेळी नेहरूंना पडतं घ्यावंच लागलं. पण त्यामुळे नेहरू माझ्यावर मात्र भयंकरच भडकले....

## मुंदडा प्रकरण
## टी. टी. के.
## आणि
## छगला

पुढील लेखांक



तिचंही देहावसान झालं होतं. तीच ती स्थिती. धनुष्याकृती झालेला देह! डॉक्टर पोचायच्या आतच सारं संपलं होतं. या खेपेस मात्र डॉक्टरांनी त्वरित पोलिसांना पाचारण केलं होतं. पोलीस आयुक्त वेळ न दवडता तेथे आले होते. तिची बहीण दुःखावेगानं व्याकुळ झालेली होती. एका आठवड्यापूर्वीच ती तेथे आपल्या नुकत्याच विधवा झालेल्या बहिणीच्या सांत्वनासाठी आली होती. अन् आज तीही मृत्युमुखी पडली होती!

पोलीस आयुक्तांनी तिला काही प्रश्न विचारले तेव्हा त्यांना असं कळलं की, तिची मृत बहीण काही घटकापूर्वी एका सयामी मांजरापाशी खेळत होती. काही क्षणातच तिची जिव्हा वळू लागली. तिला घेरी आली नि तिची दातखीळ बसली. डॉक्टरांना तावडतोब तिनं बोलावलं. पण ते येण्यापूर्वीच सारं संपलं होतं!

डॉक्टर आणि पोलीस आयुक्त व ती बहीण यांच्यापुढं गेल्या आठवड्यातलं दृश्य पुन्हा उभं राहिलं होतं. तिच्या मृत बहिणीच्या नवऱ्याचंही निधन त्याच त्या स्थितीत, त्याच त्या तपशिलानं धनुर्वात होऊन घडलं होतं. तेही मांजरास खेळवीत होते. ते मांजर इराणी जातीचं होतं. तेवढाच काय तो फरक होता.

पोलीस आयुक्तांनी तो मृतदेह नीट न्याहाळून पाहिला. डॉक्टरही तिथंच होते.

"डॉक्टरसाहेब," पोलीस आयुक्त म्हणाले, "मानेवरील हे व्रण पाहिलेत का? मांजराच्या नखामुळं ते उमटलेत."

डॉक्टरांनी होकारार्थ मान हलवली. तसेच व्रण तिच्या मृत पतीच्या गुढघ्यांवरही उमटलेले पोलीस आयुक्तांनी डॉक्टरांच्या नजरेस एक आठवड्यापूर्वी आणले होते. पण त्या वेळी डॉक्टरसाहेबांना ते व्रण विशेष दखल घेण्यासारखे वाटले नव्हते. म्हणून त्या संदर्भात डॉक्टर गप्प राहिले.

पोलीस आयुक्तांनी इकडं तिकडं सर्व कसून पाहिलं. मृतदेह ज्या पलंगावर ठेवला होता त्या खाली त्यांना एक पेन्सिलीचा तुकडा मिळाला होता. तो त्यांनी खिशात ठेवून दिला. प्रेत हलविण्यात आलं. त्या घराभोवती सक्त पहारा ठेवण्यात आला.

काही क्षणापूर्वी, तासापूर्वी मांजर परत नेण्यासाठी मृतबाईचे दीर येऊन गेल्याचं त्या बहिणीकडून त्यांना कळलं.

त्यावर त्यांनी काही विशेष भर न देता ते शेजारच्या घराकडे वळले. त्यांचे काही सहकारी त्यांच्याबरोबर होते. त्या घराकडे जायला त्या विस्तीर्ण कुंपणातून वाट होती. त्या वाटेने ते गेले. गेल्या आठवड्यात ते तेथे गेले होते. पण त्यांना कुणीही तेथे आढळलं नव्हतं. ते घर त्या मृत बाईच्या दिराचं घर होतं. त्यांनी मुक्त किल्लीनं त्या घराचं दार उघडलं. आपल्या काही सहकाऱ्यांना बाहेर पाळतीवर उभं केलं होतं व काहींच्या समवेत ते आत शिरले. एकदोन दालनं सोडल्यानंतर त्यांना एक चिंचोळं, काळोखं पण लांबट असं दालन आढळलं. त्याच्या छताला दोन टोकावर दोन भरलेल्या सुसरी टांगलेल्या होत्या. भिंतीवरील काचपेट्यात भरलेले अनेक पशुपक्षी होते. दलनातील अनेक कपाटात जादूटोण्यावरील अनेक ग्रंथ होते. एका पिंजऱ्यात अनेक मांजरी होत्या. तेव्हा एका मांजरीच्या पंजांना जंतूनाशक द्रव्याचा तीव्र वास येत होता. ते सयामी जातीचं होतं. त्यांचे इतर सहकारी दुसरं काही विशेष सापडतं का हे पहात होते. त्यापैकी एकानं घडीचं मेज उघडलं त्याला तेथे एक हस्तीदंती पंजाच्या आकाराचा नुकताच तासलेला बोरू दिसला. तो त्यानं पोलीस आयुक्तांना दाखविला. त्यांनी न्याहाळून वास घेऊन, इकडे तिकडे फिरवून तेथेच ठेवून दिला. दुसऱ्या एका सहकाऱ्याला तेथे एक सूक्ष्मदर्शक यंत्र दिसलं. त्याच्या बैठकीवर काचेच्या एका ताटली-

# मनी मानसीचं माध्यम

● म. अ. दळवी ●

मध्ये काही जंतू असलेले दिसले. त्यांनी त्या यंत्रातून ते नीट न्याहाळून पाहिले. त्यांच्या चेहेऱ्यावरून त्यांना हवं ते मिळालं होतं असं दिसलं. नंतर ते सर्व पुन्हा तेथील सर्व सामान जसंच्या तसं ठेवून त्या घराबाहेर पडले.

जेव्हा जेव्हा ते त्या घरी त्या ग्रहस्थांना भेटावयास गेले तेव्हा तेव्हा ते भेटले नाहीत. त्यांच्यावर पाळत ठेवून ते आत आहेत अशी खात्री करून पोलीस आयुक्त आपल्या सहकाऱ्यासमवेत पुन्हा मुक्त किल्ली वापरून आत शिरले. दारावरील घंटा वाजवून कुणीच उत्तर दिलं नाही म्हणून त्यांनी तसं केलं.

या खेपेस ते गृहस्थ अचंबीत होऊन जागच्या जागी स्थिर राहिले. पोलीस आयुक्तांनी त्यांची झडती घेतली. नाखुशीनं का होईना पण त्यांनी ती घेऊ दिली. त्यांच्या खिशातून काही कागद मिळाले ते पोलीस आयुक्तांनी आपल्या ताब्यात घेतले. त्यांच्यावर पाळत ठेवण्याची सोय करून ते तडक आपल्या प्रयोग शाळेत गेले. त्या कागदावर काही अस्पष्ट भाग होता. शास्त्रीय रीतीनं पाहाणी केल्यावर त्यांना असं आढळून आलं की त्यांनी आपल्या खिशात जी पेन्सिल ठेवली होती ती तशा प्रकारं लिहिलेलं गुपीत लिहिण्याची पेन्सिल होती.

त्यांना तो मजकूर महत्त्वाचा होता. त्या मृत स्त्रीनं मरण्यापूर्वी त्या कागदाच्या समासात लिहून ठेवलं होतं की, आपल्या मृत्यूस व आपल्या पतीच्या मृत्यूस दीर कारणीभूत होते. ते कागद प्रत्यक्ष मृत्युपत्र होतं. व ते दीर नष्ट करणं शक्य नव्हतं कारण तसं करणं त्यांच्याही हिताचं नव्हतं. एवढा पुरावा मिळताच पोलीस आयुक्तांनी आपला पुरावा व आपले धागेदोरे बळकट केले.

ते जे गृहस्थ होते ते स्वतः डॉक्टर होते. ते एका प्रवासी बोटीवर डॉक्टर होते. ते जगभर हिंडत असत. तेथेच जादूटोणा आणि तत्सम विद्येचा त्यांनी अभ्यास केला होता. ते आपल्या बंधूप्रमाणंच अविवाहित होते. त्यांचे बंधूही जहाजाचे कप्तान होते. आपल्या नेमस्तमणानं त्यांनी बचत करून थोडी पुंजी जमविली होती. त्यातून त्यांनी ते घर विकत घेतलं होतं. शिवाय वर्षापूर्वीच त्यांनी विवाह केला होता. ते त्याच सुमारास तेथे स्थायिक झाले होते. त्यांच्या बंधूनीही जवळच घर विकत घेतलं होतं. ते दोघेही बंधू जेव्हा अविवाहित होते तेव्हा त्यांनी मृत्यूपत्रं केली होती. की आपल्या पश्चात दुसऱ्यास आपली मालमत्ता मिळावी. पण कप्तान बंधूंनी विवाह केल्यामुळं डॉक्टर बंधूस ते खटकू लागलं. तेव्हा त्यांनी ते मृत्युपत्र आपल्या भावाने बदलू नये म्हणून षड्यंत्र रचलं. त्यात आपल्या भावाचा आणि भावजयीचा बळी घेतला होता.

त्या भावजयीचा बळी घेतल्यानंतर दोनच दिवसात त्यांना पुन्हा त्या घरी पाचारण करण्यात आलं. कारण त्या बहिणीचाही अंत घडून आला होता. पण या खेपेस मात्र तो धनुर्वातानं घडलेला आढळला नाही. पेयातून विष देऊन तो घडवून आणला होता. मध्यंतरीच्या काळात ते त्या डॉक्टरबंधूंना अटक करण्याची तयारी करीत होते. पण ही घटना घडली. त्यांनी मृत देह नीट न्याहाळून पाहिला पण त्याला उठवताना त्यांना एक हस्तीदंती पंजावजा बोरू त्याच्या सोललेल्या टोकाला एक लाल डाग असलेला आढळला. तो काळजीपूर्वक त्यांनी गुंडाळून घेतला.

तेथून ते तडक त्या डॉक्टरभावास अटक करण्यासाठी गेले. खरं म्हणजे त्या घरावर पहारेकरी होते. पण तेथे जाऊन पहातात तर त्यातला एक मृतवत पडलेला आढळला. त्याला लोखंडाच्या गजानं डोकं फोडून मारण्यात आलं होतं. ते डॉक्टरबंधू तेथे नव्हते. दुसरा पहारेकरी बेपत्ता होता.

एक-दोन दिवसांत त्यांना तारेनं एक निरोप आला. त्यात ते डॉक्टरबंधू शेजारच्या देशास गेले आहेत. आपण त्यांचा पाठलाग करीत आहोत. पुढच्या सूचना मागितल्या होत्या. तो दुसरा पहारेकरी होता. त्यानं आपलं कार्य चोख बजावलेलं होतं. वकिलातीतून संपर्क साधून आरोपीस मायदेशी रवाना करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी परवानगी मिळवली. त्या देशाच्या पोलिसांच्या समवेत आणि त्या पहारेकरी अधिकाऱ्याच्या बरोबर त्या डॉक्टरबंधूंना आणण्यात आलं. पण ते जेव्हा पोलीस आयुक्तांच्या समोर आले तेव्हा आयुक्तांनी त्वरित हुकूम सोडला, "हे आजारी आहेत. यांना त्वरित दवाखान्यात न्या. यांचा जबाब लिहून घ्या."

त्या डॉक्टरांच्या पेटीमध्ये काही कागद सापडले. ते नुकतेच लिहिलेले आढळले. त्यांनी पलायन करण्यापूर्वी त्या बहिणीला विषाचं पेय कसं दिलं; पण ती शुद्धीवर असताना तिनं त्यांच्या हातातील तो हस्तीबोरू कसा खेचून त्यांच्या मानेला टोचला होता ते लिहिलेलं होतं. मांजरामुळंच आपल्या भावाचा आणि भावजयीचा मृत्यू घडला होता हे तिला कळून चुकलं होतं. म्हणून पुनश्च एकदा मांजराच्या माध्यमानं धनुर्वात घडवून मृत्यु आणता येत नव्हता म्हणून हा विषप्रयोग त्यांनी केला होता. मालमत्तेच्या प्रलोभनानं आपण चार व्यक्तींच्या मृत्यूस कारणीभूत झालो आहोत याचीही कबुली त्यांनी दिली होती, पण आपलाही अंत त्याच मार्गानं होईल अशी त्यांची अपेक्षा नव्हती.

दवाखान्यातून पोलीस आयुक्तांस काही तासांतच दूरध्वनीवरून संदेश आला. त्यांच्या आरोपीचं धनुर्वातानं निधन घडलं होतं.

"हंऽ!" ते स्वतःशीच पुटपुटले 'मांजरांच्या नखांना ह्या हस्तीदंती बोरूनं त्यांनी धनुर्वाताचे ते जालीम जंतू लावून आपल्या बंधूचा नि भावजयीचा खून केला. कोण हा पेशास काळीमा! पेशान डॉक्टर असल्यामुळं ते भयंकर जंतू जमवून त्यांनी हा दुष्ट प्रयोग केला. मांजरावर काही परिणाम होऊ नये म्हणून नंतर जंतुनाशक वापरून त्यांनी दया दाखविली पण आपल्या नात्यागोत्यांच्या माणसास त्यांच्या करवी त्यांनी संपवलं! काय जग असतं पहा! काही सुचेनासं झालं आहे पहा या साऱ्या प्रकारान!!'

त्यांच्या सभोवतालच्या त्यांच्या सहकाऱ्यांनी माना हालवून त्यांच्या या टिपणास अनुमती दर्शविली. नंतर ते सारे शोक सागरात बुडून गेले. या चौकशीमागं असताना त्यांना आपल्या एका सहकाऱ्यास गमावून बसावं लागलं होतं. ◻ (आधारित)

क्रीडांगण

एमेम

# तिसऱ्या कसोटीसाठी तरी साळगावकरची निवड व्हावी !

एक्काहत्तर साली वेस्टइंडिज व नतर इंग्लडला त्याच्याच मैदानावर धूळ चारल्यानतर, भारतीय क्रिकेट सघाची जनमानसातील प्रतिमा उचावली होती. 'विश्वविजेता सघ', 'अजित सघ' अशी नाना तऱ्हेची विशेषण फेकली जायची भारतीय सघाकडे ! या अनाठायी अतिउत्साहाला अकुश लावण्याचे काम वेळोवेळी आणि वेळप्रसगी कप्तान अजित वाडेकर करीत असे. 'आम्ही अजून विश्वविजेते नाही आहोत, अजून ऑस्ट्रेलियावर विजय मिळवायचाय आम्हाला', ही वाडेकरची नेहमीची वाक्य. पण त्याचवेळी तो आणखी एक महत्त्वाच वाक्य बोलायचा. 'लोकहो, आम्ही विजयी झालो असलो तरी आमचा सघ अजून परिपूर्ण नाही. गावसकरच्या साथीत खेळायला एक आघाडीचा फलदाज आणि नवीन चेंडू (केवळ हाताळण्यासाठी नव्हे, तर) टाकण्यासाठी एक चागला द्रुतगती गोलदाज असल्याशिवाय 'विश्वविजेते' पदाची बिरुदं मिरविण्याची शान आम्हाला कदापी प्राप्त व्हायची नाही !' अजितची ही वाक्य टाळया घेऊन जायची आणि त्याची प्रतिमा अधिक उचवायची. पण अजितची ही सर्व वक्तव्ये एक तर शुद्ध मानभावीपणाची द्योतक तरी असावीत किंवा निवडसमितीत वाडेकरला काही अधिकार तरी नसावेत ! तस नसत तर आज भारतीय सघात पांडुरग साळगावकर दिसला असता.

चार महिन्यापूर्वी श्रीलकेच्या दौऱ्यावर जेव्हा साळगावकरची निवड झाली तेव्हा द्रुतगती गोलदाजीचे नष्टचर्य सपणार अशी शका (भीती ?) वाटू लागली आणि त्या दौऱ्यात साळगावकरने दमदारपणे, दिवस-दिवस तुफानी गोलदाजी करून जेव्हा सर्वाधिक गडी बाद केले तेव्हा तर वरील शक्यतेची खात्रीच वाटू लागली. त्यामुळे केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील सर्व समीक्षकानी आपापल्या अपेक्षित सघात साळगावकरची निवड करून टाकली (आणि जेव्हा साळगावकरला डावलले गेले तेव्हाही या सर्वांनी त्याबद्दल निषेधच नोदवला !)

साळगावकरची निवड अशी सर्व तऱ्हेने अपेक्षित असताना तो का डावलला गेला ? याची काही सुसगत कारणेही आहेत. श्रीलकेवरून आपली मडळी जेव्हा परत आली तेव्हा इग्लडचा सघ निवडण्यासाठी पुण्यात एक चाचणी सामना झाला होता. निवडसमितीचे सर्व सभासद सामना पाहाण्यासाठी आले होते. या सामन्यात साळगावकर निष्प्रभ ठरला. त्याची कारणे होती दोन. एक म्हणजे नेहरू स्टेडियमची दगडी खेळपट्टी व दुसरे म्हणजे मन्सूरअलीखान पतौडी ! पतौडीपुढे साळगावकरने नागी टाकली होती. पण त्यादिवशी पतौडीच इतका फॉर्मात होता की (शर्मिला टागोर उपस्थित होती म्हणूनही असेल कदाचित) साळगावकरच काय पण हॉल ग्रिफिथ, स्नो-अर्नोल्ड वगैरे मडळीनाही त्याने त्या दिवशी साळगावकरप्रमाणेच छक्के लगावले असते. कधीकधी एखादा फलदाज इतका लहरीत येतो की जगातील कुठलाही गोलदाज त्या दिवशी त्याला बाद करू शकणार नाही असं वाटत ! या सामन्यामुळे साळगावकर निवडसमितीच्या सभासदाच्या मनातून एकदम उतरला. पतौडीला जिथे हा गोलदाज बाद करू शकत नाही तिथे तो बायकॉट, ॲमीस, फ्लेचर वगैरे मडळीपुढे काय दिवे लावणार या शकेचा किडा निवडसमितीच्या सभासदाच्या डोळयात वळवळू लागला. आणि शकेला खतपाणी घालण्यासाठी मग इतरही गोष्टी उपयोगी पडू लागल्या. उदाहरणार्थ . इंग्लडच्या फलदाजाना दर्जेदार द्रुतगती गोलदाजी खेळण्याचा चागला सराव आहे, वगैरे वगैरे.

पुण्याचा सामना झाल्यानतर मग कलकत्याला झालेल्या महाराष्ट्र-बगाल या रणजीकरडकाच्या सामन्यात ईडन गार्डन्सच्या जिवत खेळपट्टीवर साळगावकरने हैदोस घातला व कठीण परिस्थितीतून महाराष्ट्राला विजयी केले. पण ही गोष्टही निवडसमितीला प्रभावीत करू शकली नाही. उलट नतर हैदराबादशी झालेल्या सामन्यात साळगावकर (एकच दिवस खेळून) निष्प्रभ ठरल्याने निवडसमितीच्या निर्णयावर जणू शिक्कामोर्तबच झाले.

साळगावकरची निवड न करण्यामागे आणखीही एका गोष्टीची मजबूती होती. ती म्हणजे आपल्या फिरकी गोलदाजांच्या सामर्थ्यावरील दुर्दम्य विश्वास ! पण यात एका गोष्टीकडे सोयीस्करपणे डोळेझाक केली गेली आहे. गेल्या तीन वर्षात इग्लडविरूद्ध होणारी ही लागोपाठची तिसरी लढत ! गेल्या दोन लढतीतील चद्रशेखर, बेदी, वेकटराघवन, प्रसन्न व अबीद-सोलकर हे गोलदाज याही लढतीत आहेतच. पण त्याहीपेक्षा विशेष गोष्ट म्हणजे गेल्या दोन लढतीत, आपली गोलदाजी खेळलेल्या फलदाजानाच याही लढतीच्या वेळी इग्लड खेळवीत आहे. यात एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. एकाहत्तर साली आपण जेव्हा दौऱ्यावर गेलो तेव्हा आपली फिरकी गोलदाजी जवळजवळ सर्वोच्च स्थानावर पोचली होती. उलट इग्लडच्या ॲमीस, फ्लेचर, ग्रेग, डेनिस वगैरे फलदाजाची फलदाजी त्यावेळी पौगडावस्थेत होती. त्यामुळे त्यावेळी असलेल्या आपल्या गोलदाजीच्या धारेला यावेळी काही विशेष टोकदारपणा प्राप्त झाला अशातला भाग नाही. पण इग्लंडच्या फलदाजीला मात्र या तिसऱ्या लढतीच्या प्रसगी चागलीच मजबूती आलीय्. आपल्या गोलदाजीचा व इग्लडच्या फलदाजीचा असा असमांतर आलेख डोळयासमोर असताना तरी आपल्या निवडसमितीने यावेळी जरा निराळे डावपेच लढवायला हवे होते.

अर्थात साळगावकरला डावलल्यानतरही निवडसमितीच्या दृष्टीने

त्याची उपयुक्तता सपली नव्हती. मुबईत झालेल्या सराव शिबिराच्या वेळी त्याला पाचारण केलेच होते. इतकेच नव्हे तर त्याला इग्लडला 'ग्रोव्हर स्कूल'मध्ये पाठविण्याचे एक निमित्तच होते. खर म्हणजे आपल्या फलदाजाना सराव देण्यासाठी त्याचा उपयोग व्हावा हा साळगावकरच्या प्रयाणामागचा प्रधान हेतू असावा. कारण तिथे जाळ्यातील सरावात साळगावकर गोलदाजी करतो ! (वाचा बाळ पडिताची 'सकाळ'मधील बातमीपत्रे.)

हा लेख लिहित असताना दुसऱ्या सामन्याचा एक दिवस सपलेला आहे. त्यावरून व पहिल्या कसोटीतील पराभवावरून आपल्या फिरकी गोलदाजीतील भेदकता नाहीशी झाल्याचे दिसून येते. एवीतेवी साळगावकर आता तिथे उपलब्ध आहेच. तेव्हा त्याला तिसऱ्या कसोटीसामन्यासाठी तरी बोलावण्याचा 'प्रयोग' वाडेकर – अधिकारीनी करावा.

साळगावकरला वगळल्यानतर जेव्हा प्रचड टीका झाली तेव्हा अधिकारी – वाडेकर यांनी सागितले की 'हा दौरा छोटा आहे. त्यामुळे प्रयोगाला इथ वाव नाही.' साळगावकरला सघात घेणे हा जर प्रयोग होऊ शकतो तर मग गोपाळ बोस, नाईक याना आघाडीत खेळण्यासाठी पाचारण करण्यात आले तो प्रयोग ठरत नाही का ? मदनलालची निवड हाही एक प्रयोग नाही का ?

आणि प्रयोग न करण्याचे आश्वासन तरी कितीस पाळल जातय ? प्रत्यक्षात दिसतय की आपली निवडसमिती तिथे रगीबेरगी प्रयोग करीत आहे. उपकर्णधार वेकटला गाळून प्रसन्नला घेण्याचा जसा धाडसी प्रयोग त्यानी केला तसाच खास आघाडीसाठी म्हणून नेण्यात आलेल्या बोस-नाईक याना डावलून, इतकेच नव्हे तर इजिनिअर-अबीद यानाही बाजूस सारून एकनाथ सोलकरला आघाडीत खेळविण्याचा एक फसलेला प्रयोगही वाडेकर–अधिकारीनी करून पाहिला. एक-दोन सामन्यात नवीन चेडू गावसकरच्याही हातात दिला होताच ! एकूण काय प्रयोगच प्रयोग !

असो. पहिल्या कसोटीतील पराभवानतर भारतीय सघात बेदिली माजल्याच्या गोष्टी सध्या बोलल्या जातात. बोर्डाचे चिटणीस श्री. चदगडकर यानी परवा या गोष्टीचा 'अफवा' म्हणून उल्लेख केला ! नुकतीच 'सोबत' साप्ताहिकात पॉली उम्रीगरची एक मुलाखत प्रसिद्ध झाली होती. त्यात 'टीम स्पिरीट'बद्दल त्याना विचारण्यात आलेल्या प्रश्नासंबधात ते (उपरोधिकपणाने) म्हणाले, 'टीम स्पिरीट ना, दौरा सपल्यानतरच बघा काय ते !'

एकूण काय तर सघभावना, सघभावना म्हणून उभारण्यात आलेल्या कल्पनारम्य मनोऱ्याचे उच्चाटनही तितक्याच सहजपणे व्हायची चिन्हे दिसू लागली आहेत !

□ □

## पहिले पर्व संपले : पृष्ठ ८ वरून

राजकीय शक्ती जास्त वरचढ ठरल्या. आपल्या मतानुसार, स्वार्थानुसार त्या एकूण आदोलनाला वळण देऊ शकल्या. आणि स्वार्थ साधल्यावर आदोलन मागे घेण्याच्या घोषणा नेत्याकडून करवून घेऊ शकल्या. खऱ्या जनआंदोलनात हे असे घडू शकले नसते. ह्या दृष्टीनेच, निदान पहिल्या पर्वात तरी हे यशस्वीरित्या छेडले गेलेले आदोलन उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने किंवा काही मूलभूत प्रश्नावर खळबळ उडवून द्यायच्या दृष्टीने अयशस्वी ठरले.

मराठवाड्याच्या पाचही जिल्ह्यातून मी हिंडलो. अनेकाशी चर्चा केली. त्यावरून मला असे जाणवले की, एकूणच आंदोलनाविषयी फार परस्पर विरोधी कल्पना लोकाच्या मनात होत्या. 'वेगवेगळ्या आंदोलनामुळे वर्षभर पोराचा अभ्यास फार बुडला होता. त्यामुळे अनेकांना परीक्षा नको होत्या. आदोलनाचा रेटा देऊन, परीक्षा न घेता प्रमोशन पुष्कळाना हवे होते. वसमतमुळे शासनाने ते निमित्त पुरवले. आदोलन उभे राहिले. शेवटी परीक्षा देणे चुकत नाही म्हटल्यावर, तारीख पुढे ढकलणे, एटीकेटी मिळवून घेणे वगैरे सवलती मिळाल्यावर ते मागे घेतले गेले.' हा एक सूर मला आढळला. हा साधारणतः अपक्षांचा सूर.

दुसरा सूर असा की, 'वसमत प्रकरणामुळे विद्यार्थी भडकले. चीड खदखदत होतीच. ती उफाळून वर आली. आदोलनाची ठिणगी पडली. तिला जिकडन जसा वारा मिळाला, त्या दिशेने ती पेटत गेली. भडका उडवीत आदोलन पसरत गेले. काही ध्येयाने, काही शिस्तीचे पालन करून प्रयत्नाने उभारलेले आदोलन यशस्वी होते. त्या साऱ्याचाच इथे अभाव होता. भ्रष्टाचार विरोध, आपल्याच माणसावर उलटणार म्हटल्यावर त्याला विकास-लढ्याचे स्वरूप दिले गेले. 'मराठवाड्याचा विकास' हा इथला नाजूक विषय त्याला हात घातला की सहजी लोकाच्या भावनांना हात घालता येतो. भ्रष्टाचार, महागाई वगैरे नाणी चालत नाहीत म्हटल्यावर विकासाचे चलनी नाणे वापरले गेले. विद्यार्थ्यांच्याही ते गळी उतरवले गेले. (शेवटी विद्यार्थ्यांच्या म्हणजे म्हणजे विद्यार्थी नेत्याच्या ! आणि हे विद्यार्थी नेते म्हणजे शेवटी सध्याच्या प्रस्थापिताच्या गाद्या पुढे चालवायसाठी जाणून बुजून रिंगणात सोडले गेलेले 'ट्रेनी'च !)...... '

तिसरा सूर असा की, 'आदोलनाला विकासावर येणे अपरिहार्य होते. भ्रष्टाचार किंवा बेकारी किंवा महागाई ही अशा एखाददुसऱ्या आदोलनाने नष्ट होऊ शकत नाही. त्या दृष्टीने गुजराथचे उदाहरण फार जवळचे, अलिकडचे आणि फार बोलके आहे. आदोलनानी गुजराथ मत्रिमडळाचा बळी घेतला तेव्हा ते यशस्वी झाले असे वाटले. पण चिमणभाई गेल्यावर तिथली महागाई आणखीनच वाढली, बेकारी वाढली आणि भ्रष्टाचारही वाढला ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा ह्या प्रश्नावर छेडले जाणारे आदोलन फार.फार सर्वंकश हवे. त्यासाठी पिढ्यापिढ्याची होळी करायला तयार असणाऱ्या, सर्वस्व झुगारून द्यायला तयार असणाऱ्या कार्यकर्त्यांचा ताफा हवा. इथे साधा सत्याग्रह करून तुरुंग भरायला तयार असणाऱ्यांची वाण

होती. तो कार्यक्रम यशस्वी होणेच कठीण होते. साध्या कार्यक्रमाची ही कथा, तर भ्रष्टाचार-विरोधी द्याव्या लागणाऱ्या प्रदीर्घ लढ्यात पडलेल्याच्या सर्वस्वाची किंमत द्यावी लागणाऱ्या लढ्याची काय वाट लागली असती, ते काय सांगायला पाहिजे का? मराठवाड्यातील आंदोलकाची मने अशा लढ्यासाठी तयार झालेली नव्हती, आजही झालेली नाहीत हे मान्य करायलाच पाहिजे. प्राप्त परिस्थितीत, मग आंदोलनापुढे दुसरा मार्ग तरी विकासाशिवाय नव्हताच. विकासाच्या प्रश्नाबाबत, मराठवाड्यातल्या प्रत्येकाच्या मनात चीड आहे. हैद्राबादच्या स्वातंत्र्य-लढ्यात मराठवाड्याची जनता उत्स्फूर्तपणे सहभागी झाली. त्या वेळी आशा होती की, हैद्राबादकडून निजामी राजवटीत होणारे मराठवाड्याचे शोषण स्वातंत्र्यानंतर बंद होईल. स्वतंत्र भारतात हैद्राबाद राज्यातल्या मराठवाड्याचा योग्य विकास होईल. परंतु असे घडले नाही. हैद्राबादकडून होणारे शोषण तसेच सुरू राहिले. विकास अर्थातच शून्य! संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मराठवाड्याने पुन्हा उत्स्फूर्त भाग घेतला. आपली संस्कृती जाणणाऱ्या मराठी माणसांत गेल्यावर हे शोषण थांबेल असे वाटून म्हणूनच, विदर्भाने घातल्या तशा कुठल्याही पूर्व अटी न घालता मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाला. निरतिशय विश्वासाने. पण तिथेही त्याचा विश्वासघातच झाला. महाराष्ट्राच्या संतुलित विकासाच्या बाता नेहमीच होत गेल्या. पण प्रत्यक्ष विकास-योजना राबवायची वेळ आली तेव्हा मात्र मराठवाडा उपेक्षिलाच गेला. मराठवाड्यात बागायत फारशी नाही. पाणी कमी. त्यामुळे ही उपेक्षा जास्तच जाणवली. मुंबई-पुणे वरचेवर पाहिला मिळून मराठवाड्याचा पिछेडेपणा जास्तच जाणवू लागला. चीड वाढीला लागली. त्यामुळे ह्या आंदोलनात, भ्रष्टाचार--महागाई प्रश्नावर लढूनही काही जमेला मिळत नाही असे जाणवले तेव्हा, आंदोलनाच्या रेटयात काही तरी मिळवून घ्यावे असे वाटले तेव्हा आंदोलन आपोआपच विकासाचे आंदोलन झाले. त्यात अनैसर्गिक, चुकीचे असे काहीच नव्हते......आणि ह्या आंदोलनाने काहीच मिळवून दिले नाही हेही खरे नाही. मुंबईला सचिवालयातली मंडळी ह्या भ्रमात म्हणा किंवा समजात आहेत म्हणा, की महाराष्ट्राच्या निर्मितीपासून मराठवाड्याच्या पदरात नेहमीच झुकते माप टाकले गेले आहे आणि मराठवाडा, विकासाच्या दृष्टीने आता मुंबई, ठाणे, पुणे पट्टा सोडला तर इतराच्या मुळीच मागे नाही. मराठवाड्याच्या विकासाचा वेगळा असा प्रश्न उरलेलाच नाही. प्रश्न आहे तो एकूणच सर्व महाराष्ट्राच्या विकासाचा. आमच्या आंदोलनाच्या दृष्टीने विचार करता, महाराष्ट्र शासनाचा विशेषत: वसंतराव नाईकांचा वरील दृष्टिकोन बदलण्यात आम्हाला यश आले हाच आमचा महत्त्वाचा विजय आहे. काही लोक म्हणतात, वसंतरावानी आम्हाला आकडेवारीच्या जंजाळात अडकावून, मागण्यांबाबत आश्वासने देऊन आमची बोळवण केली. पण हे म्हणणे म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यासारखे आहे. प्रतिपक्ष जेव्हा मराठवाडा मागासलेला आहे हे मानायलाच तयार नव्हता, तेव्हा तो तसा आहे हे त्यांना मानायला लावणे केवळ आकडेवारीच्याच आधारे शक्य होते. ते आम्ही साध्य केले. महाराष्ट्र शासनाची आकडेवारी पुन्हा तपासायला शासनाला भाग पाडले. मला वाटते, मुंबईतल्या वाटाघाटीप्रमाणेच, आंदोलनामुळेही हे शक्य झाले. आणि हे आंदोलनाचे यश नाही? *आता विकासाच्या मागण्याविषयी आम्ही* (म्हणजे विद्यार्थ्यांनी मांडलेल्या, जविप आदीनी स्वीकारलेल्या व मॉडीफॉय करून पुढे मांडलेल्या) केलेल्या मागण्याच अशा होत्या की, त्यावर निश्चित स्वरुपाची कालमर्यादा असणारी आश्वासनेच मिळणे शक्य होते. शासनालाही आकडेवारी तपासायला, मागण्याचा अभ्यास करायला, केंद्राकडून मंजुरी घ्यायला, तिथे आग्रह धरायला वाव मिळणे आवश्यक होते. आम्ही १५ ऑगस्टपर्यंत शासनाला मुदत दिली ती ह्यामुळेच. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत हा निर्णय योग्यच होता. नव्हे दुसरा पर्याय नव्हता......

"...आता मागण्याविषयी. मागण्याचा एकूणच तपशील घाईघाईने ठरवण्यात आला. झटपट काही मागण्या पुढे करून आंदोलन चालू ठेवणे आवश्यक होते., त्यामुळे फारसे विचारमंथन न होताच मागण्या मांडल्या गेल्या त्या परिपूर्ण नाहीत मराठवाड्याच्या संपूर्ण जिल्ह्याना न्याय देणाऱ्या नाहीत, ह्याची आम्हाला जाणीव आहे. पण परिस्थितीच अशी होती की, जे सुचले ते झटपट मांडून वेळ मारून न्यायला हवी होती. सारासार विचार नंतर करून सर्वसंमत मागण्या मांडू अशी कल्पना होती. पण तसा वेळच मिळाला नाही. तरीही जायकवाडी, ब्रॉड गेज, प्रत्येक जिल्ह्यासाठी एक औद्योगिक प्रकल्प, इतर काही धरणे वगैरे मराठवाड्याच्या नेहमीच्या लोकप्रिय मागण्या आम्ही धसास लावल्याच. ह्यानंतर पुढच्या मागण्यासाठी लढायला आम्ही तयार आहोतच..."

ह्या सूर आणि आंदोलनाला विकास आंदोलनाची दिशा देणाऱ्या परिस्थितीचे स्पष्टीकरण बऱ्याच जणांनी मांडले. 'एक दणका द्यावा, थोडेसे पदरात पाडून घ्यावे, परीक्षा द्याव्यात व पुढील दणका द्यायला सिद्ध व्हावे. अधिक काही मिळवावे.' हे गणित वरील स्पष्टीकरणाला साथ देताना मुसाच्या राजूरकरानी मांडले; विद्यार्थी कृतीसमितीच्या नेत्यानीही हाच सूर काही अंशी छेडला. जनतेच्या वतीने आंदोलनात सहभागी होणाऱ्या 'जविप'च्या श्रॉफ भालेराव आदी नेत्यांची तर ही *जवळजवळ अधिकृत भूमिकाच.* 'ज्या मागण्या मान्य झाल्या त्या नांदेडकरावर अन्याय होणाऱ्या होत्या' असे जरी नांदेडकराना वाटत असले तरी, आंदोलन विकासाच्या रुळावर जाण्याबाबत त्याचीही भूमिका वरीलप्रमाणेच दिसली. उस्मानाबाद, बीड जिल्ह्यातही फारशी वेगळी परिस्थिती आढळली नाही. नांदेडला 'प्रजावाणी'चे श्री. डोईफोडे ज्या मागण्या मांडल्या गेल्या, मान्य झाल्या त्यामुळे बरेच चिडलेले दिसले. प्रा. नरहर कुरुंदकरानाही आंदोलनाचे यश वर दिलेल्या सूत्राप्रमाणे मान्य दिसले....

एकूण विचारसरणीत थोडाफार फरक असला तरी, परभणी, नांदेड, आंबेजोगाई, लातूर वगैरे ठिकाणचे काही विद्यार्थी नेते वगळता, इतरत्र हे आंदोलन विकासाच्या गाड्याला जुपले गेले ह्यात फारसे काही वावगे वाटत नाही. मराठवाडा अविकसित आहे ह्यात वाद नाही. या लेखात अधूनमधून जोडलेली आकडेवारी ते दाखवूनही देईल. त्याविषयीची चीडही सर्वत्र मोठ्या प्रमाणावर आहे. साहाजिकच आहे. आणि भ्रष्टाचार-महागाई विरोधात सुरुवातीला छेडल्या गेलेल्या आंदोलनाला अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्रभर प्रतिसाद न मिळाल्याने, त्याच दिशेने आंदोलन पुढे नेऊ इच्छिणारे मागे पडले. विकासाचे प्रश्न पुढे येताच ते जनतेने उचलून धरले. पुढे रेटले. थोडेफार मिळताच आंदोलन स्थगित केले. परिस्थितीचा हा दबाव पाहाता, 'आंदोलनावर विकासाचे पाणी पडून आंदोलन वाहून गेल्याचा आक्रोश' फुका वाटतो. हा आक्रोश पुण्या-मुंबईत बसून होतो हे जास्त खेदाचे. दिनांक २ एप्रिल ते १७ एप्रिल पर्यंत, विकासाच्या मागण्या आंदोलनाला चिकटल्या नव्हत्या. वसमत गोळीबार, परीक्षा बहिष्कार (हेही खरे तर व्यापकच प्रश्न!) वगैरे निमित्ते मागे पडून, गुजराथचा आदर्श पुढे ठेवून आंदोलकांनी आपला मोर्चा भ्रष्टाचाराकडेच वळवला होता. तेव्हा तर ते आंदोलन व्यापक पायावरच उभे केले होते. मग ज्याना 'आंदोलन विकासाच्या पाण्याने वाहून गेल्याची' हळहळ वाटते, त्यानी ह्या तब्बल पधरा दिवसाच्या काळात, ह्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाचे लोण पुण्या-मुंबईत नेऊन मराठवाड्यातली चळवळ उचलून का धरली नाही? का कुणी तशी चळवळ पुण्या-मुंबईत सुरू केल्यावर त्या चळवळीवर आपण आरूढ होऊ व नाईक सरकारला नतर 'चलेजाव' फर्मावू म्हणून वाट पाहात राहिली ही मंडळी? काही का असेना, पुण्या-मुंबईच्या ह्या मंडळींनी मराठवाड्यातल्या युवाशक्तीला प्रथम सक्रीय पाठिंबा न देऊन नाउमेद तर केलेच; पण आता उगीचच, आंदोलनाला विकासाच्या गाड्याला नेऊन जोडल्याचे खापर त्यांच्यावर हीच मंडळी फोडू पाहात आहेत! मराठवाड्यात हिंडताना सर्वत्र ह्या बाबतची चीडही विद्यार्थी व युवक वर्गात मोठ्या प्रमाणावर आढळली!!

भ्रष्टाचार विरोधी आंदोलन स्थगित होऊन विकास लढा सुरू व्हायला वरीलप्रमाणेच आणखी एक थोडेसे गौण कारणही कारणीभूत आहे. व्यापारी वर्गाच्या पाठिंब्यावर, त्यांच्याकडून मिळणाऱ्या पैशाच्या मदतीवरही हे आंदोलन बऱ्याच प्रमाणात उभे होते. पैशाशिवाय धड कुठलेही आंदोलन चालवता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. जालन्याच्या विद्यार्थी कृतीसमितीच्या बैठकीच्या वेळी, आंदोलनाचे भ्रष्टाचार, महागाई विरोधी स्वरूप बदलावे ही सूचना ह्या व्यापारी वर्गाच्या दबावातून पुढे आली म्हणतात. व्यापारी वर्गाच्या आड अर्थातच सत्ताधारी होतेच. काही का असेना, पण हे दडपण विद्यार्थ्यांना दूर सारता आले नाही. त्यावेळी जर हे आंदोलन महाराष्ट्रभर पसरलेले असते तर कदाचित ह्या दडपणाला तोंड देणे विद्यार्थ्यांना सहज शक्य झाले असते. असो.

कशाही मुळे का होईना पण आंदोलन विकास लढ्याच्या स्वरूपात जास्त गाजले. त्याने जनता जागृत झाली. व शेवटी परीक्षेच्या प्रश्नावर ते मिटले. असे होऊन, विकास लढा म्हणूनच जरी ते सर्वांनी आपापल्या परीने लढवले तरी विकास विषयक निश्चित शिक्षण कुणालाच मिळाले नव्हते हेही ज्या मागण्या पुढे आल्या त्यावरून सिद्ध झाले आहे. काही कारखाने, ब्रॉडगेज, मेडिकल कॉलेज ह्यानी विकास साधेल हे शक्य नाही हे फारसे कुणालाच समजलेले नाही. विकासाविषयीच्या ह्या बाधील कल्पना खरे म्हणजे बदलायला हव्यात. शेतीचा व साधनसपत्तीचा पुरेपूर उपयोग करून घेऊन, जो जिथे आहे तिथे त्याला त्याच्या परपराशी निगडीत काम देऊन, सपत्ती वाढवली जाऊ शकते व ती तशी वाढली तरच सतुलित विकास व्यवस्थित होऊ शकेल—बाहेरच्या मदतीवर अवलंबून न राहाता. हा खरा विकास जविपचे नेते भाई श्रॉफ, अनतराव भालेराव, आदी मडळी डाव्या विचारसरणीची. विकासाच्या पुस्तकछाप मागण्याच्या मागे न जाता, मूलभूत विकासाच्या दृष्टीने जनतेला शिक्षित करणे त्यानी मनात आणले तर ते सहज शक्य आहे. शेती प्रधान देशात, शेती हा उद्योगच सर्व औद्योगिक विकासाचा पाया राहिला पाहिजे. व त्याच दृष्टीने विकासाचे मार्ग चोखाळले पाहिजेत. दोन-चार जडोद्योग मराठवाड्यात नेऊन चार पाचशेंना नोकऱ्या मिळण्यावाचून फार मोठा जनतेचा आर्थिक विकास साधणार नाही. हे सारे विचार मराठवाड्यातल्या असख्य विद्वत्जनाना नवे नाहीत. किंबहुना त्यांच्याबरोबरच्या चर्चेतूनच ते मी वर माडले आहेत. तेव्हा, 'जविप'ने आकडेवारी प्रसिद्ध करतानाच विकासाच्या दृष्टीने वरील पद्धतीने जनतेला तयार केले व त्यातून लढा उभा राहिला तर तो सर्वच अविकसित विभागाच्या दृष्टीने मार्गदर्शक ठरेल. व त्यातूनच, व्यापक पायावरील विधायक चळवळ महाराष्ट्रभर उभी राहू शकेल....

ह्या उलट चालू पर्वात, काही ढोबळ मागण्यावर आंदोलन रेटले गेले. त्या मिळण्याचे आश्वासन घेऊन ते मागे घेतले गेले. हे एकूण आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता फारसे उचित झाले असे वाटत नाही. त्यामुळे विद्यार्थीवर्गात फूट पडली. आंदोलकात अंतर्विरोध निर्माण झाले. मराठवाडांतर्गत प्रादेशिक (औरंगाबाद विरुद्ध इतर चार जिल्हे!) वाद निर्माण झाले. आणि त्यामुळे कुठल्याही कारणातून का होईना पण उभ्या राहिलेल्या व नतर झपाट्याने फोफावलेल्या चळवळीचा शेवट विस्कळीत झाला... ☐ ☐

---

**या अंतर्गत फाटाफुटी...**

**सचिवालयात नाचवले गेलेले कागदी घोडे....**

**श्रॉफ–उपवास...**

**नांदेड कृती समितीची बैठक....**

.. ..................................

**पुढील अंकी**

---

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### दि. २९ जून ७४ ते ५ जुलै ७४

### अर्थमंत्री यशवंतराय चव्हाण गाजतील

या आठवड्यात चंद्राचे भ्रमण तूळ ते धनू या तीन राशीत आहे. रवी-शनी, व रवी-बुध अशा दोन युत्या मिथून राशीत होत आहेत. महाराष्ट्राच्या सप्तमस्थानी व भारताच्या लग्नी व्ययस्थानी या युत्या आहेत. या दोन्ही ठिकाणी महाराष्ट्राचे एक मान्यवर नेते व भारताचे अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण हे संबधित आहेत. हे स्वत: सिंह व मकर राशीबरोबर निगडीत आहेत. आजची भारतीय अर्थकारणाची गाडी जरी पंक्चर झालेली असलेली तरी त्यात यशवंतरावाचा काही दोष नाही. या आठवड्यात अर्थकारणात एखादा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला जाईल व त्यात यशवंतरावांचे बौद्धिक कौशल्य त्यांचे महत्त्व वाढवायला कारण ठरेल. इंदिरा गांधीच्या ते अधिक जवळ येतील. महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळाची पुनर्रचना या आठवड्यात होण्याची शक्यता फारशी नाहीच. पण यशवंतरावांच्या सल्ल्याला महत्त्व येईलच. पुणे शहराला योग्य असा व दर्जा वाढवणारा महापौर मिळणार आहे. तो लोकप्रियही असेल.

**मेष : अपेक्षित यश**

हा आठवडा सार्वजनिक क्षेत्रात व राजकीय क्षेत्रात तुम्हाला विशेष महत्त्वाचा ठरावा असाच आहे. सोमवार आर्थिक क्षेत्रात मोठा लाभ पदरी पडेल. मंगळवार व बुधवार नोकरीतील कामे होतील. प्रामुख्याने पगारवाढीचा विचार होईल. गुरुवार मानसिक त्रास होईल व त्यासाठी देव–देव कराल. शुक्रवार उद्योग क्षेत्रात महत्त्वाची घटना घडेल. श्रीमंत उद्योगपतीकडून काही आश्वासने मिळतील. पैशाचे तात्पुरते काम होईल. **महिलांस** : मन शांत ठेवा. यावेळी संतापून उपयोगी नाही.

**वृषभ : आर्थिक हानी**

या सप्ताहाची सुरुवात तूळेच्या चंद्राने होत आहे. हा सहावा चंद्र फारसा लाभदायक ठरण्याची शक्यता कमी आहे. कारण ज्यांना पोटाचा, लिव्हरचा त्रास असेल त्यांना पहिले एक दोन दिवस तरी खाण्यावर बंधन ठेवले पाहिजे. शनिवारी व रविवारी रवी-शनी युती, रवी-बुध युती धनस्थानी होत आहे. त्यामुळे उद्योगधंद्यासाठी अगर इतर कामासाठी चालू असलेल्या प्रयत्नात अडथळे येतील. व्यापारी लोकांची आर्थिक हानी होण्याची शक्यता आहे. म्हणून त्यांनी कोणतेच धाडस करू नये. मंगळवारी विवाहाचा विचार करायला हरकत नाही. बुधवार ते शुक्रवार नोकरीत अनुकूलता. बेकारांना नोकरी मिळेल. **महिलांस** : पहिले दोन दिवस खाण्यापिण्यावर बंधन ठेवा. मंगळवार ते शुक्रवार नोकरीत सुख.

**मिथून : महत्त्व वाढेल**

आज तुम्हाला तूळेचा पाचवा चंद्र आहे ही तुमच्यासारख्या बौद्धिक कर्तृत्व असलेल्या व्यक्तीचे मोठे भाग्यच म्हणावे लागेल. तुम्ही वृत्तपत्रकार, लेखक, कवी वा नाटककार असाल तर आज वा उद्या तुमच्या या क्षेत्रातील उत्तुंग आशा सफल होतील. तुमच्या कलेचे कौतुक होईल. आज व उद्या दोन युत्या तुमच्या चंद्रापाशी होत आहेत. हे युतीचे ग्रह एवढे सामर्थ्याचे आहेत की राजकारणात व नोकरीत तुमचे महत्त्व भलतेच वाढेल. तुम्ही निवडणुकीत जरी पराभूत उमेदवार असलात तरी तुमच्या शब्दाला महत्त्व येणार आहे. सोमवार ते गुरुवार या दिवसांची दखल घ्या. नोकरीत उच्च दर्जा मिळेल. अडचणी दूर होतील. पैसा व प्रतिष्ठा मिळेल. एखाद्या वादात तुमच्या मध्यस्तीचा लाभ होईल. **महिलांस** : सार्वजनिक कार्यात मान मिळेल. नोकरी नसणाऱ्याना ती मिळेल.

**कर्क : प्रगतीत अडसर**

चौथा चंद्र सुखात साखर टाकील, पण त्याचबरोबर त्यात मिठाचा खडादेखील येईल हे विसरू नका. अंधार व प्रकाश या द्वंद्वांत तुमचा हा आठवडा घुसळून निघेल. व्ययस्थानी रवी-बुध युती होत आहे. मुळातच तुम्हाला शनी बारावा आहे. साडेसाती चालू आहे. त्यातच पहिला मंगळदेखील तुम्हाला तसा फायदा देणारा नाहीच. म्हणून यावेळी कोणतेही नवे धाडस किंवा नवी योजना हाती न घेता चालू उद्योग व्यवस्थित चालवा. अर्थ साहाय्यात अडचणी निर्माण होतील. तुम्ही जर एखादे कारखानदार असाल तर कामगारांच्या असंतोषाला तोंड द्यावे लागेल. व्यापारात नुकसान, उसने दिलेले पैसे मिळण्यात अडचणी. रविवार ते बुधवार जास्त वाईट. **महिलांस** : मुलांच्या तब्येतीची काळजी घ्यावी. नोकरीत त्रास वाढेल.

**सिंह : यशाचे वरदान**

आज शनिवार ते सोमवार तुम्हाला चंद्र इतका छान आहे की प्रामुख्याने तुम्ही राजकीय रंगमंचावर भलतेच चमकून जाणार आहात. तुमचे विरोधक व तुमची उपेक्षा करणारे सारे हितशत्रू तुमच्या यशाने तोंडात बोट घालतील. तुम्ही यावेळी सत्तारूढ पक्षात असाल तर तुमच्या सेवेचे व कर्तबगारीचे चांगलेच चीज होईल. महत्त्वपूर्ण असे स्थान तुम्हाला मिळावे. नोकरीत महत्त्वाकांक्षा सफल होण्याचे भाग्य लाभेल. स्वतंत्र उद्योग असेल तर भविष्यकालीन एखाद्या योजनेचे यश दृष्टिपथात येईल. या वेळी विज्ञान, शेती व वाणिज्य पदवीधर बेकार राहाणार नाहीत. इंजिनियर फर्म असेल तर त्यांना चांगले काम मिळणार आहे. पैसा मिळेल, पण यावेळी तो जपून खर्च करा. तब्येतीला उष्णतेचा त्रास उद्भवेल. **महिलांस** : नोकरी व धंदा यात थोडे समाधान मिळेल. हाती पैसा राहाणे कठीण.

**कन्या : नोकरीत सुख**

आठवड्यातील पहिले दोन तीन दिवस घर व संसार यात थोडा त्रास निर्माण होईल. पत्नीच्या तब्बेतीला त्रास. मुलांचे बेफाम वागणे असे काही तरी डोक्याला काळजी निर्माण करणारे जातील. पण एवढी

गोष्ट सोडली तर हा आठवडा सर्वच बाबतीत प्रगतीचा जाईल. अजून तुम्हाला कर्कस्थ अकरावा मगळ आहेच. तो पैशाची परिस्थिती समाधान कारक ठेवील. पैशाची आवक चालूच ठेवील. नोकरीत नेहमीची कामाची गर्दी व ताण कमी होईल. वरिष्ठांचे वाकडे वागणे आपोआप दूर होऊन त्याना सुबुद्धी सुचेल. ते पुन्हा तुमच्यावर खूश होतील. तुमच्या कामाचे चीज होईल. बेकाराना शुभवार्ता ऐकायला मिळेल. त्याचे काम जरी लगेच झाले नाही तरी तशी अनुकूल परिस्थिती मात्र निश्चितच निर्माण होईल. लेखकांना व नाटककारांना नवी सधी मिळेल. यश व कीर्ती घेऊनच हा आठवडा उगवत आहे. **महिलांस** : सर्वच ग्रहांचे सहकार्य आहे. त्यामुळे प्रगतीला वेग येईल पैसेही मिळतील.

**तूळ : आशादायक काळ**

आठवड्याची सुरुवातच मुळी तूळेच्या चद्राने होत आहे. त्यामुळे यश, प्रगती, सफलता, अनुकूलता याशिवाय दुसरे कोणतेच शब्द तुमच्या कानावर येणार नाहीत. सिने कलावत, नुकतेच रगभूमीवर आलेले नाट्य कलावत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणार आहेत. त्याच्या अपेक्षा पूर्ण होतील. चित्रकाराला समाजात सन्मानाचा योग येईल. तुम्ही जर गायक-वादक असाल तर सोमवार ते बुधवार तुमच्यावर स्तुतीचा वर्षाव होणार आहे. तुम्ही वृत्तपत्रात नोकरी करीत असाल तर तुमच्यावर बेकारीची पाळी येणार नाही. औषधी कारखाने, खते अशा उद्योगात असणाऱ्या नोकरदारांना वातावरण अनुकूल होईल. सर्व सामान्यपणे नोकरीत हा काळ अनुकूल आहे. पगारवाढीच्या कामाला गती वा चालना मिळेल. बदलीचा प्रयत्न यशस्वी होईल. साखर उद्योगातील वरिष्ठाना बराच लाभ होईल. **महिलांस** : बऱ्याच त्रासानतर तुम्हाला सुखाचा काळ येत आहे. कॉलेज कन्याकाना प्रेमाचा साक्षात्कार होईल.

**वृश्चिक : आर्थिक ताण**

आणखी काही दिवस तरी तुम्हाला जपूनच वागायला हवे. तुमच्या कसोटीचा काळ अजून तरी सपलेला नाही. मात्र मंगळाची कठोर वृत्ती व सहनशक्ती याचे वरदान तुम्हाला लाभले असल्यामुळे तुम्हाला खचून जाण्याचे काहीच कारण नाही. राशीस्वामी अजून तरी भाग्यस्थानी तुमच्या दैवाचे प्राणपणाने रक्षण करीत आहेच. पण त्याला रवी बुध व शनी या ग्रहांनी घेरले असल्यामुळे त्याच्या प्रयत्नाला यश येत नाही. सोमवार ते शुक्रवार आर्थिक ताण वाढणार आहे. आज व उद्या पैशाचे काम होईल. मात्र यावेळी उसन्या पैशाचे कोणतेही व्यवहार करू नका. अंगाशी येतील. उद्योगात अकस्मात अडचणी उद्भवतील. नोकरीत तुमची न्यायाची बाजू असली तरी ती कुणीच मान्य करणार नाही. **महिलांस** : मनातले मांडे मनातच जिरतील असा हा काळ आहे. जपून वागा.

**धनू : थोडी कळ सोसा**

आज ज्या 'अधारा'त चाचपडत आहेत त्यात प्रामुख्याने धनू ही रास अग्रभागी आहे. गेले अनेक दिवस तुम्ही कोणत्याही क्षेत्रात पुढे पाऊल टाकण्याचा प्रयत्न केला तरी माघारीशिवाय दुसरे काही तुमच्यापाशी येऊ शकत नाही. माघार, अपयश, असफलता हीच सध्या तरी दैवते बनली आहेत. पण तुमचा सर्वांत मोठा गुण म्हणजे सहनशीलता व त्याचे तुम्हाला वरदान आहेच. म्हणून मित्रानो, अजून थोडी कळ सोसा. प्रकाश आता फार दूर नाही. या आठवड्यात प्रामुख्याने तब्येत साभाळा. मन मरगळू किंवा निराश होऊ देऊ नका. कुलदेवतेची उपासना करा. यश नसले तरी अपयश तरी मिळणार नाही. शरीर पोखरणारा वा अशक्तपणा वाढवणारा एखादा जुना आजार डोके वर काढील असे वाटते. पैसा मात्र कमी पडणार नाही **महिलांस** : राशीस्वामी तिसरा आहे. तो सार्वजनिक कामात व्याप व प्रतिष्ठा वाढवील. तब्येतीला जपा.

**मकर : संसारात त्रास**

मगळ हा मकर राशीवर नेहमी खूश असतो. पण या वेळी मात्र तो तेवढासा खूश नाही. तो सातवा आहे. त्यामुळे ससाराच्या सुरळीत गाड्याला मधून मधून 'अपघात' होणे शक्य आहे. पतिराज तुमच्या मनाप्रमाणे वागणार नाहीत तर पत्नी तुम्हाला आवडणारे असे काही करणार नाही. त्यामुळे सतत भाडे एकमेकावर आपटत राहील. नवविवाहितानी याची काळजी अधिक घ्यावी. सोमवार ते बुधवार या दिवसाची नोद घ्या. नोकरी मात्र चागली राहील. लोकाशी सबध असलेले तुमचे काम जर असेल तर तुमचा व्याप वाढेल. अनेक दिवस चालू असलेले तुमचे बढती बदलीचे प्रयत्न यावेळी तरी चागले मार्गस्थ होतील. पैशाची स्थिती फारशी वाईट नाही. येणे असलेली पैशाची रक्कम थोडी वसुल होईल. इजिनियरिंग उद्योग करायला हा आठवडा अनुकूल आहे. **महिलांस** : वाईट दिवस मागे पडत चालले आहेत. मात्र ससारात जरा जुळवून घ्या.

**कुंभ : महत्त्वाकांक्षा वाढतील**

आज आठवड्याची सुरुवात होत असताना चद्र तूळ या कलात्मक राशीत भाग्यस्थानी आहे. हर्शल–चंद्राचा त्रिकोण योग घडत आहे. गेल्या कित्येक वर्षांत इतकी छान ग्रहस्थिती तुमच्या वाट्याला आलेली नव्हती. वैभव, प्रतिष्ठा, मानसन्मान, कर्तृत्व इत्यादी सारी जीवनातील महत्त्वाची आयुधे जणू तुमच्यावर चवऱ्या ढाळण्यासाठी सज्ज झालेली आहेत. दैव देऊ लागले म्हणजे 'दो करानी' देते असे म्हणतात तसाच हा प्रकार आज तुमच्या वाट्याला आला आहे. तुम्ही मुळातच महत्त्वाकांक्षी व्यक्ती म्हणूनच ओळखल्या जाता. राशिस्वामी पचमस्थानी आहे तर मगळ सहावा आहे. नोकरी, व्यवसाय, राजकारण, समाजकारण, सार्वजनिक कार्य या सर्वच क्षेत्रात तुमचे नाव गर्जून जाणार आहे. पैसा व बगला मिळणार आहे. नोकरीत अत्युच्च पदाचा व राजकारणात श्रेष्ठ पदाचा लाभ होईल. रविवार ते बुधवार हे दिवस महत्त्वाचे. **महिलांस** : उची साड्या व अलंकार अगावर व प्रवासासाठी गाडी याचा तुम्हाला लाभ होईल.

**मीन : सुधारणा होईल**

या आठवड्याची सुरुवात जरी फारशी ठीक नसली तरी सोमवारपासूनचे दिवस अनुकूल आहेत. या वेळच्या तुमच्या भाग्याची सारी मदार आहे ती पचमस्थ मगळावर. तो मात्र तुमची प्रतिष्ठा व दर्जा साभाळणार आहे. सार्वजनिक जीवनात तुमचे नैतिक बळ तुम्हाला मोठेपण मिळवून देणार आहे. लेखक म्हणून तुम्हाला पहिली प्रसिद्धी व पैसा मिळण्यासारखा काळ आहे. शनिवार व रविवार पचनशक्ती जरा मदावेल. पित्ताचा त्रास होईल. सुखस्थानी यावेळी दोन युत्या झालेल्या आहेत. त्यामुळे मनःस्थिती थोडीफार अस्वस्थ व चचल राहील. बगल्याच्या अगर राहात्या जागेच्या व्यवहारात थोड्या त्रासाने अपेक्षित यश मिळेल. परिस्थितीनुरूप बगल्याची इच्छा पुरी होईल. नोकरीत नव्या योजनेवर तुमची नियुक्ती होईल. पगारवाढ व उत्पन्न वाढेल. उद्योगात मागच्यापेक्षा सुधारणा दिसेल. **महिलांस** : वकिलीची परीक्षा देणाऱ्या महिलास मोठे यश मिळेल. नोकरीत वरची जागा मिळणार आहे. ☐ ☐

राष्ट्रीय बचत संघटना

1 एप्रिल 1974 पासून

# वाढीव व्याज दर देत आहे

| सिक्युरिटीज व खातीं | जुने वार्षिक दर | नवे वार्षिक दर |
|---|---|---|
| टपाल कचेरी बचत बँक* | 4% | 5% |
| 7 वर्षे मुदतीचीं राष्ट्रीय बचत पत्रें दुसरी व तिसरी मालिका* | 5% | 5% |
| 7 वर्षे मुदतीचीं राष्ट्रीय बचत पत्रें चौथी व पांचवी मालिका | 7.5% (चक्रवाढ) | 8.25% (चक्रवाढ) |
| टपालकचेरी मुदत ठेवी | | |
| 1-वर्ष | 6% | 6.75% |
| 2 आणि 3-वर्षे | 7% | 7.5% |
| 5-वर्षे | 7.25% | 8% |
| 5 वर्षे मुदतीचीं टपालकचेरी फेरजमा (पुनरावर्त) ठेव खातीं | 6.75% | 7.25% |
| 10 वर्षे मुदतीचीं टपालकचेरी संचित मुदत ठेव खातीं** | 4.75% | 5.25% |
| 15 वर्षे मुदतीचीं पब्लिक प्रॉव्हिडंट फंड खातीं** | 5.3% | 5.8% |

* व्याज करमुक्त.

** कराच्या बाबतींत सवलत-पात्र तसेंच व्याजहि करमुक्त.

विशिष्ट योजनांवरील व्याजासमवेत, इतर योजनांवरील 3000 रुपयांपर्यंतचे वार्षिक व्याज करमुक्त.

**आताच बचत करा अधिक बचत करा**


राष्ट्रीय बचत संघटना

टपाल पेटी क्रमांक 96, नागपूर

davp 74/78

## चकनाचूर

भाऊ पाध्ये



गोल्डीचे म्हणजेच विजय आनंदचे डोळे सरदारजीच्या पेहेरावात पब्लिकला डबल क्रॉस करू शकले.

# अपेक्षा आहेतच, गोल्डी !

अदाकारी म्हणजे काय ?

परवा ' मेरे सलाम ' या चित्राचा नवीन हिरो रवी याच्याशी गप्पा मारताना विषय निघाला. रवी म्हणाला अदाकारी म्हणजे आवाज ' अमिताभकडे पहा ! '

अर्थातच अदाकारी म्हणजे आवाज म्हटल्यावर बऱ्याच चांगल्या अदाकारांना कोणी अदाकारच म्हणणार नाही. उदाहरणार्थ कॅथेरिन हेपबर्न. आपल्याकडचे उदाहरण घ्यायचे म्हणजे संजीवकुमार, प्रेमनाथ, दादा कोंडके.

तरीसुद्धा हिंदी चित्रपट म्हणजे पडद्यावरचे नाटक असते. नाटकातील अदाकारीला आवाज हा लागतोच. त्याच्याशिवाय चालतच नाही. आपल्याकडे आवाज असलेले नट कोणते. बुजुर्गापैकी प्राण, स्व. बलराज साहनी, राजकपूर आणि चालू जमान्यातले राजेश खन्ना, शत्रुघ्न सिन्हा, अमिताभ बच्चन, रझा मुराद, इथेच ही यादी संपत नाही. आणखी एक नाव मला घालावेसे वाटते. विजय आनंद उर्फ गोल्डी.

' तेरे मेरे सपने 'मधला मला तो प्रसंग आठवतो. ज्यावेळी, एका तुरुंगवजा विराण कोठडीमध्ये हिप्पीसारखे बालवाला आणि जाड चष्मावाला गोल्डी शराब लगाऊन बसलेला असतो. देव आनंद त्याला भेटायला आलेला असतो. गुहेतून आवाज घुमत उमटावा त्याप्रमाणे गोल्डीचा गहरा आवाज घुमतो, ' इथे विराण आहे आणि विराण दुनियेशिवाय तुला काही मिळणार नाही. या विराण जगाला उतारा म्हणून शराब प्यावी लागते. '


प्रसंग असा असावा, अभिनय असा असावा. आपल्याकडे चांगले आवाज असलेले एवढे ॲक्टर्स असूनही प्राण जर सोडला तर गोल्डीशिवाय आवाजाने अभिनय कोणी केल्याचे मी तरी पाहिले नाही.

' ट्रॅपीझ 'मध्ये बर्ट लँकेस्टर आवाजाने अभिनय करतो, किंवा जेम्स स्टुअर्ट ' रोप 'मध्ये असा अभिनय करतो. अशा प्रकारच्या अभिनयाच्या पाठीमागे बुद्धीने भूमिका पेलण्याचे जे एक सामर्थ्य लागते ते अर्थातच हिंदी चित्रपट धंद्यामध्ये गोल्डी खेरीज दुसऱ्या कुणाकडे आहे असे आपल्याला वाटत नाही. गोल्डी हा तसा डायरेक्टर आणि संकलक. या दोन्ही क्षेत्रात ' कंसेप्शन ' ही गोष्ट गोल्डीची खास गोष्ट. सुप्रसिद्ध संकलक व्ही. के. नाईक हे संकलनात ' गोल्डीचा ' हात कोणी धरू शकत नाही असे सांगतात. ' तेरे मेरे सपने 'मधील देव मुमताझमधील प्रणय दृश्ये गोल्डीच्या दिग्दर्शनातील कंसेप्शनची साक्ष देतात. ' जुएल थीफ 'मध्ये देव आपल्याच ' साया 'च्या शोधात असतो,

बी. आर. फिल्म्सच्या ' छत्तीस घंटे 'मध्ये
परवीन आणि विजय अरोरा.
दिग्दर्शक आहेत राज तिलक.



त्यात ती सारी कंसेप्शन, हिचकॉकसारख्या मातब्बरांच्या तोडीची आहेत. अलीकडे गोल्डीने ' ब्लॅकमेल 'सारखी बकवास चित्रे काढून आपल्याला एकदम खाली लोटून दिले आहे हे खरे. आज ' धर्मा ' च्या ' चांद 'सारखा फालतू दिग्दर्शक गाजतोय आणि गोल्डीसारखा दिग्दर्शक दिग्दर्शनाच्या क्षेत्रात काहीच करीत नाही असे चित्रपट धंद्यातील विरोधा–भासी चित्र दिसते आहे. आमचे मित्र श्री. वाय. गाडगीळ गोल्डीला एका पार्टीत गाठून म्हणाले, ' गोल्डीसाहेब, काय हे ? तुमचा ' तेरे मेरे सपने ' पाहून आम्ही तुमच्या पासून केवढ्या अपेक्षा बाळगल्या होत्या नी तुम्ही आम्हाला ' ब्लॅकमेल 'सारखे चित्र दिलेत. त्यावर गोल्डीने त्यांना उत्तर दिले ' माझ्याबद्दल तुम्ही अपेक्षा ठेवताच कशाला ?' हे गोल्डीचे उत्तर ! आमच्या सिनेमात गोल्डीपासून अपेक्षा ठेवायच्या नाहीत तर काय जोगिंदर पासून ? गोल्डीच्या अभावी हृषिकेश मुखर्जींना हिन्दी चित्रपट सृष्टीतील श्रेष्ठ दिग्दर्शक म्हणून कबूल करण्याची आफत येऊन पडली आहे.
गोल्डीने गाडगिळांना दिलेल्या उत्तरात, गोल्डीच्या स्वभावातील वैफल्याचा कडवटपणाच दिसून येतो. गोल्डीमध्ये हा कडवटपणा का, हे समजणे कठीण आहे. ' जॉनी मेरा नाम ' हे गोल्डीच्या दिग्दर्शनामधील आणखी एक यशस्वी चित्र. गोल्डीच्या लेखी या चित्राचे यश अनपेक्षित होते. या चित्रातील गाणी गाजली, पण गोल्डी मात्र एखाद्या बुनशिखनप्रमाणे ह्या चित्रामधली गाणी अनावश्यक होती असे सांगत राहिला. जॉनीचे यश त्याला आवडले नाही. तसेच ' तेरे मेरे सपने 'चे अपयशही त्याला आवडले नसावे. गोल्डीची त्यामधली भूमिका ' आनंद 'मधल्या अमिताभच्या भूमिकेपेक्षा कितीतरी श्रेष्ठ होती, दिग्दर्शन हृषिदाच्या ' आनंद 'पेक्षाही श्रेष्ठ होते. पण फिल्मफेअरसारख्या पारितोषिक देणाऱ्या मंडळींनी गोल्डीचा विचार केला नाही. कदाचित ' तेरे मेरे सपने 'मध्ये देवपेक्षा आपली कामगिरी भरीव आहे, याची जाणीवही त्याला झा ी असेल. आणि म्हणून, ' छुपा रुस्तुम ' या पिक्चरमध्ये देवला हिरो बनवून त्याने



हिरोगिरी गोल्डीच्या बस की बात नव्हती. रेखापुढे गोल्डी इतका बावळट वाटला. (डबल क्रॉस)

कॅमेरा स्वतःवर चालवण्याची छुपे रुस्तुमगिरी केली आहे आणि ते चित्र आपल्या ग्राऊशो मार्क्स् स्टाईलच्या भूमिकेने खिशात टाकले. पण, त्याची ती कामगिरीही पब्लिकला पसंत पडली नाही. 'कोरा कागज़'मध्ये त्याच्या स्वभावातला सारा कडवटपणा त्याने आपल्या भूमिकेत ओतला आहे. खरं म्हणजे 'कोरा कागज़' मधल्या भूमिकेला गोल्डी भलताच जून वाटत होता. जयाच्या मासूम अल्लड भूमिकेसमोर त्याचा निर्विकार, कोरा चेहरा प्रेक्षकांना कबूल करणे अशक्य होते. हा असामी 'अंडर प्ले' चांगले करतो एवढंच त्याचं क्वालिफिकेशन असावं. पण त्याच्या हाडात सध्या जो कडवटपणा जिरलाय, नि गाडगिळांना दिलेल्या उत्तरातून तो व्यक्त झाला, तोच त्याच्या या भूमिकेतून व्यक्त होतो. तो अखेर दिनेश हिंगूला फोन करून सांगतो ना, "तुझ्या बहिणीला घेऊन जा इथून." त्या वेळी जयाऐवजी दुसरी कोणी साधीसुधी गृहिणी असती तर ती हादरून रडली असती. गोल्डी 'तेरे मेरे सपने'पासून पडद्यावर धूमकेतूसारखा येऊन ठाकला आहे. एरवी पडद्याआड गोड व्यक्तिमत्त्व असणारा हा माणूस आचार्य रजनीशांची भगवी कफनी घालून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातील उमदेपणात हीण आणतोय आणि पडद्यावर चष्म्याशिवाय कोऱ्या, जून आणि निर्विकार चेहऱ्याने हिरोगिरी करून लोकांना 'डबल क्रॉस' करतोय. या माणसाने चष्मा तर घातलाच पाहिजे, त्याशिवाय त्याचे निस्तेज डोळे झाकणारच नाहीत. हिप्पीसारखे केस वाढवावेत, छुपा रुस्तुम स्टाईलच्या मिशाही लावाव्यात, त्याला फार शोभून दिसतात. आणि 'हिंदुस्थान की कसम'मध्ये त्याने गीतेचे तत्त्वज्ञान सांगणारी ती गहिऱ्या आवाजात शायरी पेश केली तशी शायरी पेश करावी. कधी तरी पडद्यावर, तसेच मर्दुमकी करताना मरावे नि त्याच्या मुलाप्रमाणे आमचे आणि त्याचे कम्युनिकेशन अर्धवट रहावे. त्या वेळेस मन भरून येणे म्हणून काय क्षण असतो ना, तो क्षण अनुभवणे हीच आमची अपेक्षा आहे. गोल्डीसाहेब, आपल्या अपेक्षा तुमच्याकडून आहेतच; तुम्ही ऐका नाहीतर नका ऐकू. ◻

'अंजान राहे'मध्ये
अकबरखान – झाहिरा



## बाझार बंद करो

'बाझार बंद करो' हे बी. आर. इशारांचे चित्र. एरवी सेन्सीबली काढलेले. पण अखेर इशारा आपल्या प्रत्येक चित्रातून काहीतरी नैतिक गोष्टी आग्रहाने सांगणारच. त्यांनी या चित्रात कमीत कमी आग्रह करून 'बाझार बंद करो' म्हणून सांगितले तरी समीक्षकांना ते प्रचारकी थाटाचे वाटणारच. त्याला इशारांचाही इलाज नाही आणि आमचाही नाही. एक गोष्ट काय आहे, इशारांची, ते लोकांना ठाऊक असलेल्या गोष्टीच पडद्यावर दाखवतात. चिक्कार टिडियसली दाखवतात. आपल्या पात्रांना कळसूत्री बाहुल्याप्रमाणे वागवतात आणि एकसुरी बोलायला लावतात. मजा अशी की हे सारं 'बाझार बंद करो'मध्ये नाही. त्यांनी नेहेमीप्रमाणे 'बाजार'मध्ये नवे चेहेरे पेश केले. अरविंद किराड आणि मधु मांजरेकर. दोन्ही मराठी माणसे. दोघेही फ्रेश चेहेऱ्याचे. अरविंद किराड हा एक आवाज असलेला ॲक्टर आहे. कुठच्याही इंडस्ट्रीतल्या हिरोइतका हँडसम आहेच. मधुही खुबसुरत आहे. मराठी इंडस्ट्रीला म्हणे चांगले हिरो-हिरॉइन्स मिळत नाहीत. मग इशाराला कसे मिळाले.

## इन डिफेन्स ऑफ हिंदी सिनेमा

एका गरीब मध्यम वर्गातली एक शाळकरी मुलगी दूधकेंद्रावरील बाटल्या पोहोचवण्याचं काम करून पैसा कमवीत होती. पैसा हातात आल्यापासून ती खाणे-पिणे-फॅशन्सवर उडवू लागली. हळुहळू तिने आपल्या दुधाच्या गिऱ्हाईकांना बंडले मारून पैसे काढण्यास सुरुवात केली. एका गिऱ्हाईकाच्या ते लक्षात आलं. त्याने आपल्या पत्नीस त्या मुलीचा बंदोबस्त करण्यास सांगितले. त्या पत्नीने त्या मुलीला एक दिवस फसवण्याच्या आरोपावरून अल्लाद पकडलं नी तिच्या आईसमोर उभं केलं. एकूण त्या मुलीला आता आई 'ठीक' करील अशीच अपेक्षा होती.

पण आईने दोन रुपये काढले नी मुलीच्या हातात टेकवले. 'तू पैशाला फार लालचावली आहेस. पैशाची फार लालच लागली की माणसं कुठच्या थराला जातात आणि पुढे त्यांच्या आयुष्याचं काय होतं, हे 'पाप-पुण्य'मध्ये पहा आणि धडा घे!'

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर